cmyk

## संपादकीय

### म्युझिक कॉन्सर्ट, रेव्ह पार्टी: समाजासाठी धोक्याची घंटा

शहरांमधील झगमगाट, महागडी तिकिटे, तेजस्वी लाईट्स आणि कानठळ्या बसवणारे संगीत म्युझिक कॉन्सर्ट किंवा रेव्ह पार्ट्यांचे हे आकर्षक चित्र आजच्या तरुणाईला भुरळ घालत आहे. पण या चमकदार पडद्यामागे एक भीषण वास्तव दडलेले आहे. अंमली पदार्थांचे वाढते जाळे. गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये घडलेली दुर्दैवी घटना हेच अधोरेखित करते की, मनोरंजनाच्या नावाखाली सुरू असलेली ही संस्कृती आता जीवघेणी बनत चालली आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४२ | गुरूवार दि.३० एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### कर्जमाफीत प्रोत्साहन निधी वाढवून द्या–बच्चू कडू

अकोला: शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावर प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा सरकारचे लक्ष वेधून घेतले आहे. कर्जमाफीच्या बाबतीत मी बोललो आहे. तुम्ही जो शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी देत आहात. तो वाढवून द्यावा लागेल. आता जरी देता आला नाही; तर तो दुसऱ्या टप्प्यात वाढवून द्यावा लागेल. यासाठी वेळेप्रसंगी आंदोलन करु, असा इशारा त्यांनी राज्य सरकारला दिला आहे. त्यांनी मुंबईत बुधवारी (दि.२९ एप्रिल) घेतलेल्या पत्रकार परिषदेत शेतकरी प्रश्नी भूमिका स्पष्ट केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात केली होती. याची आता कार्यवाही सुरु आहे.

### वऱ्हाडावर काळाचा घाला; नववधूसह ३ ठार

जळगाव : जळगावच्या धरणगाव तालुक्यातील वराड (खुर्द )जवळ महामार्गावर टायर फुटल्याने लग्नाच्या गाडीला भीषण अपघात झाला. या काळजाचा थरकाप उडवणाऱ्या अपघातात नववधू पूजा रवी वाघळकर, दत्तू भागवत आणि जगदीश वाघळकर या तिघांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने वाघळकर परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातमधील वापी येथून लग्नाचा सोहळा आटोपून वऱ्हाड क्रुझरने अकोल्याच्या दिशेने जात होते. नुकतेच लग्न पार पडल्यामुळे गाडीत उत्साहाचे वातावरण होते. पण जळगावमधील वराड गावाजवळ महामार्गावर धावत्या क्रुझरचे पुढचे टायर अचानक फुटले. टायर फुटल्याने चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि गाडी थेट महामार्गालगत उभ्या असलेल्या गॅस टँकरवर जाऊन धडकली. ही धडक इतकी भीषण होती की क्रुझरचा पुढच्या भागाचा चुराडा झाला.

### सिबीआयच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना तुरूंगवास

दिल्लीः च्या तीस हजारी कोर्टाने एक महत्वाचा निर्णय दिला. त्यांनी सीबीआयच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना १९८५ च्या बॅचचे आआरएस अधिकारी अशोक कुमार अग्रवाल यांना बेकायदेशीरपणे अटक करून त्यांच्यावर जोर जबरदस्ती केल्याप्रकरणी तीन महिन्यांचा सामान्य तुरूंगवासाची शिक्षा सुनावली. ज्युडिशिएट मेजिस्ट्रेट फर्स्ट क्लास शशांक नंदन भट्ट यांनी तत्कालीन इन्सेपक्टर वी. के. पांडे, निवृत्त तत्कालीन डीसीबी रमेश जे सध्या सीबीआयचे सह संचालक आहेत त्यांच्याविरूद्ध निकाल दिला. शिक्षेत तुरूंगवासासोबतच न्यायालयाने प्रत्येक दोषीला तक्रारदाराला ३० दिवसांच्या आत ५० हजार रूपये नुकसान भरपाई देण्याचे देखील आदेश दिले आहेत. हे प्रकरण १९ ऑक्टोबर २००० चे आहे. न्यायालयाच्या निर्दशनास आले की, कॅटच्या आदेशाला अयशस्वी करण्यासाठी आधीच कट रचला गेला होता. तो आदेश हा अग्रवाल यांच्या बाजूचा होता. कायदेशीर निर्देशांचे पालन करण्याऐवजी या अधिकाऱ्यांनी अग्रवाल यांच्या घराचा दरवाजा तोडला. त्यांच्यासोबत जोर जबरदस्ती केली आणि वाईट हेतूने त्यांना अटक देखील केली. या झटापटीवेळी अग्रवाल यांच्या डाव्या हाताला दुखापत देखील झाली होती.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२९ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७३.५० क्विंटल | २,००० | २,७७० | २,३७१ |
| ज्वारी/हायब्रिड: ७४.०० क्विंटल | १,७०० | ३,२६१ | २,१८९ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८.५० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ५९.०० क्विंटल | १,८०० | २,८२५ | २,३४० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ४,९०१ | ५,१९० | ५,०४७ |

# उत्तर प्रदेशच्या धर्तीवर राज्यातही खतांचे लिंकींग बंद करणार

## दत्तात्रय भरणे यांची माहिती, कृषी निविष्ठा विक्री व्यावसायिकांचा संप मागे

मुंबई । प्रतिनिधी

**कंपन्यांकडून रासायनिक खतांचा पुरवठा होताना होत असलेले लिंकींग बंद होण्याबाबत उत्तर प्रदेशने जो आदेश काढला त्या धर्तीवर राज्यातही निर्णय घेण्यात येईल. राज्यातील कृषी निविष्ठा विक्री व्यावसायिकांच्या विविध प्रश्नांवर घेतलेल्या सकारात्मक निर्णयांमुळे कृषि निविष्ठा विक्रेत्यांचा २७ एप्रिलपासून असलेला संप शेतकरी हितासाठी मागे घेत आहेत याबद्दल कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी संघटनेचे आभार मानले.**



मंत्रालय परिषद सभागृह येथे कृषी निविष्ठा विक्री व्यवसायातील अडचणीबाबत माफदा संघटनेचे प्रतिनिधींसमवेत बैठकीत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार राजेश बकाने, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह व्हीसीव्दारे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी संचालक सुनिल बोरकर, माफदा संघटनेचे विनोद तराळ पाटील, ऑल इंडियाचे अध्यक्ष मनमोहन कलंतरे यासह संघटनेचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, उत्तर प्रदेशमध्ये खत उत्पादक ▶▶ पान २ वर

### कृषी निविष्ठा संदर्भात केंद्रीय कृषी मंत्र्यांना भेटणार

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, ई-पॉस वापरकर्त्यांवर तात्पुरत्या स्वरूपात कारवाई करणार नाही. राज्यातील कृषी निविष्ठा संदर्भातील विविध प्रश्नाबाबत केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा यांची भेट घेऊन मार्ग काढणार आहोत. विक्रेते बियाणे पुरवठादार कंपन्यांकडून सीलबंद पॅकिंगमध्ये खरेदी करून शेतकऱ्यांस सीलबंद पॅकिंगमध्येच विक्री करीत असल्यामुळे तपासणीमध्ये बियाणे व रासायनिक खते व किटकनाशके यांचे सॅम्पल फेल गेल्यास विक्रेत्यास आरोपी न करण्याबाबतचा हरियाणा राज्याचा अशा निर्णयाचा अभ्यास केला जाईल व त्यानुसार निर्णय घेऊ. मुदतबाह्य किटकनाशके पुरवठादार कंपन्यांनी विक्रेत्यांकडून परत जमा करून घेण्याबाबत माफदा व विविध कंपन्यासोबत चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल असेही म्हणाले.

# एक्झिट पोल ;प.बंगालमध्ये ममता ‘दीदी डेंजर झोन’मध्ये

मुंबई । प्रतिनिधी

देशाचं लक्ष लागलेल्या ५ राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी आज मतदान प्रक्रिया संपूर्णपणे पार पडली. पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ९० टक्के मतदान झाले असून पहिल्या टप्प्यात मतदानाची एकूण आकडेवारी ९२ टक्क्यांहून अधिक होती. त्यामुळे, पश्चिम बंगालमध्ये यंदा बदलाचे वारे वाहत असल्याचं राजकीय तज्ञाचं मत आहे. मतदानाची वाढीव टक्केवारी ही विरोधातील पक्षाला आणि केंद्रातील





सत्ताधारी भाजपला पूरक असल्याची चर्चा होत असतानाच आता एक्झिट पोलचे आकडेही समोर आली आहेत. मॅट्रीझ च्या एक्झिट पोलनुसार पश्चिम बंगालमध्ये ममता बनर्जीच्या १५ वर्षांपासूनच्या सत्तेला सुरूंग लागू शकतो.

मॅट्रीझच्या एक्झिट पोलनुसार, भाजप बहुमताचा आकडा पार करू शकते, प. बंगालमधील २९४ जागांपैकी भाजपला १४६ ते १६१ जागांवर विजय मिळण्याचा अंदाज आहे. तर, ममता बॅनर्जींच्या तृणमूल कॉंग्रेसला १२५ ते १४० जागांवरच थांबावे लागणार असल्याचे दिसून येते. तर, कॉंग्रेससह डाव्या विचारसरणीच्या पक्षांना मिळून अवघ्या ६ ते ७ जागांवर समाधान मानावे लागेल, असा अंदाज आहे. बंगालमध्ये यंदा भाजपला ४२ टक्के मतं मिळण्याची शक्यता आहे, तर टीएमसीच्या ▶▶ पान २ वर

# मस्साजोग सरपंचपदाच्या निवडणुकीत स्व.संतोष देशमुखांची पत्नी पराभूत

बीड । प्रतिनिधी

**केज तालुक्यातील मस्साजोग सरपंचपदाच्या पोटनिवडणुकीत धक्कादायक निकाल लागल्याचे समोर आले आहे. दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी आणि सरपंचपद पोटनिवडणुकीच्या उमेदवार अश्विनी देशमुख यांना पराभवाचा धक्का बसला आहे. ग्रामपंचायत सदस्य स्वरुपानंद देशमुख पोटनिवडणुकीत विजयी झाले आहेत. संतोष देशमुख यांच्या पत्नीचा ९२ मतांनी पराभव झाला आहे.**

मस्साजोगच्या गावकऱ्यांनी विरोधात कौल दिल्याने सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. मंगळवारी झालेल्या मतदानात एकूण २०८० मतदारांपैकी १७४४ जणांनी आपला



मतदानाचा हक्क बजावला होता. त्यानुसार एकूण ८४ टक्के मतदानाची नोंद झाली. त्यानंतर मतमोजणीनंतर विजयाची माळ कोणाच्या गळ्यात पडते, याकडे स्थानिकांसह राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले होते. खरेतर ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा देशमुख कुटुबियांनी व्यक्त केली होती, परंतु मागच्या वेळी अवघ्या ९ मतांनी पराभूत झालेल्या स्वरुपानंद देशमुख यांनी यावेळी आपला अर्ज कायम ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर ; मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, एआयच्या विश्वात महाराष्ट्राने महत्वाकांक्षी पाऊल टाकले आहे. महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर करण्यात आले आहे. याबैठकीत ऊर्जा, वन विभाग, दिव्यांग सक्षमीकरण, महसूल आणि आदिवासी विभागासंदर्भातही निर्णय घेण्यात आले आहेत.






एआयच्या विश्वात राज्याचे महत्वाकांक्षी पाऊल पडले असून, या एआय धोरणामुळे राज्यात दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक आणि दीड लाख रोजगार ▶▶ पान २ वर

# वाळू धोरण २०२५ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा

## अवैध उत्खनन रोखण्यासाठी कडक नियम , महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील वाळू उत्खनन आणि विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी तसेच अवैध वाळू उपशावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. त्यानुसार ८ एप्रिल २०२५ च्या वाळू धोरणात काही महत्त्वाचे बदल



केले आहेत. या नव्या सुधारणांमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर आता भरारी पथकांचे काटेकोर लक्ष राहणार असून काही नियमही कडक करण्यात आले आहे.

शासन निर्णयानुसार, वाळूची अवैध वाहतूक रोखण्यासाठी तालुका आणि उपविभाग स्तरावर विशेष भरारी पथके नेमण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या पथकांमध्ये महसूल विभागासोबतच इतर विभागांच्या ▶▶ पान २ वर

### दाभोळकर हत्या प्रकरणातील दोषीला जामीन

मुंबई । प्रतिनिधी

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्या प्रकरणात दोषी असलेल्या शरद कळसकरला मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती ▶▶ पान २ वर

# ठाकरे यांच्याकडून विधानपरिषदेसाठी अंबादास दानवेंच्या नावाची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या विधानपरिषद निवडणुकांसाठी उमेदवारांची घोषणा होत असून, भाजपने प्रज्ञा सातव यांच्यासह ६ नावे जाहीर केली आहेत. त्यानंतर, ठाकरेंच्या शिवसेनेकडून देखील विधानपरिषद निवडणुकांसाठी नाव जाहीर करण्यात आले. मविआचे उमेदवार म्हणून स्वत: उद्धव ठाकरेंनी विधानपरिषदेची उमेदवारी घ्यावी, असा आग्रह कॉंग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेककडूनही केला जात होता. मात्र, शेवटच्या क्षणापर्यंत आघाडीवर असलेले नाव मागे घेत स्वत: उद्धव ठाकरेंनी अंबादास दानवे यांचे नाव जाहीर केले. या स्पर्धेत शिवसेना ▶▶ पान २ वर

# गॅस संकट आणखी गंभीर होणार ?

## मध्यपूर्वेतील परिस्थिती अधिकच बिघडली, भारताची चिंता वाढली



मुंबई । प्रतिनिधी

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या तणावाचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या स्वयंपाकघरावर दिसू लागला आहे. अमेरिका-इराण संघर्षामुळे मध्यपूर्वेतील परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून त्याचा फटका तेल आणि गॅस पुरवठ्यावर होत आहे. अशातच जगातील सर्वात मोठी तेल कंपनी सौदी अरामकोने घेतलेल्या एका निर्णयामुळे भारतासह अनेक देशांची चिंता वाढली आहे.

कंपनीने मे महिन्यापर्यंत एलपीजी म्हणजेच लिक्विफाइड पेट्रोलियम गॅसच्या शिपमेंट्स पूर्णपणे थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आधीच तणावाखाली असलेल्या पुरवठा साखळीवर आणखी दबाव निर्माण होण्याची ▶▶ पान २ वर

### जनतेवर थेट परिणाम

भारतात एलपीजीचा वापर मोठ्या प्रमाणावर स्वयंपाकासाठी केला जातो. त्यामुळे पुरवठा कमी झाला किंवा दर वाढले तर त्याचा थेट परिणाम सामान्य कुटुंबांच्या खर्चावर होऊ शकतो. जागतिक तणाव, बंद पडलेला समुद्री मार्ग आणि अरामकोचा निर्णय या सगळ्या घडामोडींमुळे पुढील काही आठवडे भारतासाठी आव्हानात्मक ठरू शकतात. त्यामुळे आता सरकार परिस्थिती हाताळण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




सेवानिवृत्त उपअभियंता

इंजि.अशोक भानुदासराव खेडकर यांना

सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र यांच्या वतीने जाहीर झालेला

राज्यस्तरीय उत्तम प्रशासक पुरस्कार

आज पुणे येथील यशदा मध्ये

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती ना.प्रा. राम शिंदे साहेब, महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे साहेब आणि पद्मश्री मा. पोपटराव पवार यांच्या हस्ते आज प्रदान होत आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास हार्दिक शुभेच्छा..!

::: शुभेच्छुक :::

मा.अशोक खेडकर साहेब

मित्र परिवार पाथर्डी/आष्टी


cmyk

## अग्रलेख

# म्युझिक कॉन्सर्ट, रेव्ह पार्टी : समाजासाठी धोक्याची घंटा

शहरांमधील झगमगाट, महागडी तिकिटे, तेजस्वी लाईट्स आणि कानठळ्या बसवणारे संगीत म्युझिक कॉन्सर्ट किंवा रेव्ह पार्ट्यांचे हे आकर्षक चित्र आजच्या तरुणाईला भुरळ घालत आहे. पण या चमकदार पडद्यामागे एक भीषण वास्तव दडलेले आहे. अंमली पदार्थांचे वाढते जाळे. गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये घडलेली दुर्दैवी घटना हेच अधोरेखित करते की, मनोरंजनाच्या नावाखाली सुरू असलेली ही संस्कृती आता जीवघेणी बनत चालली आहे.

बिस्मात सिंह मसीन आणि श्रेया राय या दोन विद्यार्थ्यांचा 'एक्स्टसी'सारख्या अंमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे झालेला मृत्यू हा केवळ अपघात नाही, तर संपूर्ण व्यवस्थेचे अपयश आहे. जेथे कार्यक्रमासाठी कडक अटी-शर्ती घालून परवानगी दिली जाते, तेथेच सुरक्षा यंत्रणेतील त्रुटींमुळे ड्रग्ज सहजपणे आत पोहोचतात, हे अत्यंत चिंताजनक आहे. एका सुरक्षा रक्षकाने पैसे घेऊन विनातिकीट प्रवेश देणे आणि त्याच मार्गाने ड्रग्जचा पुरवठा होणे, ही बाब गंभीर शंका निर्माण करते. ही केवळ निष्काळजीपणा आहे की संगनमत? आज 'ड्रग्ज' हा केवळ गुन्हेगारी विषय राहिलेला नाही, तर तो सामाजिक प्रतिष्ठेचा भाग बनवण्याचा धोकादायक ट्रेंड तयार झाला आहे. श्रीमंत कुटुंबातील तरुण-तरुणींसाठी रेव्ह पार्टी म्हणजे 'स्टेटस सिम्बॉल' झाले आहे. २००७ मध्ये पुण्यातील डोणजे येथे झालेली राज्यातील पहिली मोठी रेव्ह पार्टी आणि त्यावर झालेली कारवाई हे उदाहरण अजूनही ताजे आहे. त्या घटनेनंतरही परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही, उलट ड्रग्जचा विळखा अधिकच घट्ट होताना दिसतो. म्युझिक कॉन्सर्ट हे ड्रग्ज तस्करांसाठी 'सोन्याची खाण' ठरत आहेत. गर्दी, गोंधळ, अंधार आणि मोठ्या प्रमाणावर होणारी ये-जा याचा फायदा घेत हे तस्कर तरुणांपर्यंत सहज पोहोचतात. आयोजक, सुरक्षा रक्षक किंवा इतर कर्मचाऱ्यांना हाताशी धरून हे जाळे अधिक मजबूत केले जाते. परिणामी, तरुणाई नशेच्या आहारी जात आहे आणि त्याचे शेवट प्राणघातक ठरत आहेत. 'एक्स्टसी', 'एलएसडी', 'कोकेन', 'एमडीएमए' यांसारख्या महागड्या ड्रग्जचे सेवन ही फक्त श्रीमंतांची मर्जी राहिलेली नाही, तर ती एक फॅशन बनली आहे. या पदार्थांमुळे संवेदना तीव्र होतात, पण त्याचवेळी विवेक हरपतो. अश्लील वर्तन, हिंसाचार, अपघात आणि मृत्यू अशा घटना घडतात. समाजातील नैतिक मूल्येही या प्रक्रियेत झिजत आहेत.

मुंबईसारख्या महानगरात ड्रग्जचे जाळे किती खोलवर पसरले आहे, याची कल्पना विविध भागांतील वाढत्या कारवायांवरून येते. देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून होणारी तस्करी, औद्योगिक वसाहतींमधील बेकायदेशीर उत्पादन, ग्रामीण भागातील गुप्त कारखाने या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे संपूर्ण समाजावर वाढते संकट. विशेषतः महाविद्यालयीन तरुणाई या जाळ्यात अडकत आहे, ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. या पार्श्वभूमीवर सरकार आणि यंत्रणांनी केवळ कारवाई करून भागणार नाही, तर प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे.

म्युझिक कॉन्सर्ट आणि मोठ्या कार्यक्रमांसाठी परवानगी देताना कठोर अटी आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक आहे. सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी निश्चित करून त्यावर देखरेख ठेवणे गरजेचे आहे. ड्रग्जविरोधी मोहिमा अधिक व्यापक आणि प्रभावी स्वरूपात राबवणे आवश्यक आहे. तरुणांमध्ये जनजागृती करून नशेचे दुष्परिणाम समजावून सांगणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

समाजानेही या प्रश्नाकडे केवळ 'तरुणांची चूक' म्हणून पाहणे थांबवले पाहिजे. पालक, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना यांनी एकत्र येऊन या समस्येला सामोरे जाण्याची गरज आहे. गोरेगावमधील घटना ही एक इशारा आहे. जर वेळेत कठोर पावले उचलली नाहीत, तर महाराष्ट्रासह देशाची अवस्था 'उडता पंजाब'सारखी होण्यास वेळ लागणार नाही. मनोरंजनाच्या नावाखाली सुरू असलेली ही नशेची संस्कृती रोखणे ही केवळ प्रशासनाची नाही, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

# सिरसाळा ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे शेख नसीब विजय

## राष्ट्रवादी व एम.आय.एम.च्या उमेदवाराचा केला पराभव

**बीड । प्रतिनिधी**

**परळी तालुक्यातील सर्वात मोठ्या १०,५०० मतदान असलेल्या सिरसाळा ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार शेख नसीब यांनी दणदणीत विजय मिळवत पक्षाचा झेंडा उंचावला आहे. मंगळवारी (दि. २९) जाहीर झालेल्या निकालात शेख नसीब यांनी ८५० मताधिक्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवाराचा पराभव करत आपली ताकद सिद्ध केली. या विजयामुळे परळी तालुक्यात शिवसेनेची पकड अधिक मजबूत झाल्याचे चित्र दिसून येत आहे.**

या निवडणुकीत शिवसेनेच्या वतीने शेख नसीब आिण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे देवराव काळे व एम.आय.एम.च्या उमेदवारात चुरशीची लढत झाली. यामध्ये शेख नसीब यांनी ३,५०० मते घेऊन देवराव काळे यांचा ८५० मतांनी पराभव करुन विजय मिळविला. दरम्यान सिरसाळा ग्रामपंचायत पोटीनिवडणूक अतिशय प्रतिष्ठेची झाली होती प्रचारादरम्यान शिवसेनेच्या उमेदवारांनी मतदारांशी थेट संवाद साधत स्थानिक प्रश्नांवर भर दिला होता, ज्याचा स्पष्ट फायदा उमेदवाराला झाला. नुकत्याच झालेल्या परळी नगर पालिकेतही शिवसेनेचे दोन नगरसेवक विजय झाले होते. यामुळे परळी मतदारसंघात शिवसेनेची ताकद वाढल्याचे दिसून आले . विजयानंतर शिवसेनेचे सचिव संजय मोरे जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठवाडा संपर्कप्रमुख अशोक पटवर्धन तसेच जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे यांनी विजयी उमेदवार शेख नसीब यांचे अभिनंदन करत पुढील विकासकामांसाठी शुभेच्छा दिल्या.

# बोरखेड येथे नृसिंह जन्मोत्सवाची जय्यत तयारी

**बीड । प्रतिनिधी**



**तालुक्यातील बोरखेड येथील पुरातन लक्ष्मी नृसिंह मंदिरात येत्या गुरुवार दि.३० एप्रिल रोजी सायंकाळी ६:५५ मिनिटांनी लक्ष्मी-नृसिंह जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाच्या निमित्ताने कीर्तन, महाआरती, महाप्रसाद व भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन लक्ष्मी-नृसिंह मंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.**

बोरखेड येथे अंदाजे साडेतीनशे वर्ष पुरातन लक्ष्मी नृसिंह मंदिर असून, या मंदिराची वास्तुकला पेशवेकालीन स्वरूपाची मानली जाते. मंदिराच्या गाभाऱ्यात लक्ष्मी नृसिंहाची अतिशय सुबक आणि प्राचीन मूर्ती आहे. २०२३ पासून या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू झाले. मागील दोन वर्षात बीड जिल्ह्यासह पर जिल्ह्यातील भाविकांनी केलेल्या आर्थिक मदतीतून मंदिराच्या शिखराचे बांधकाम पूर्ण झाले. दरम्यान नृसिंह जन्मोत्सवानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्र मास सुरूवात झाली असून दि. रविवार दि. २६ रोजी भगवाध्वज उभारून आणि भगवान लक्ष्मीनृसिंह यांना शेंदूर विलेपन करून घटस्थापना करण्यात आली आहे.

# राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते आनंदग्रामचे दत्ताभाऊ बारगजे यांना जीवन गौरव पुरस्कार

**मुंबई । प्रतिनिधी**

**आनंदग्रामचे संस्थापक दत्ताभाऊ बारगजे यांना समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल १८व्या न्यूज़मेकर्स अचीव्हर्स अवॉर्ड्स २०२६ अंतर्गत जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.**



हा पुरस्कार १ मे २०२६ रोजी, महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सायंकाळी ७ वाजता, नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमधील रंगस्वर ऑडिटोरियममध्ये आयोजित सोहळ्यात प्रदान केला जाणार आहे. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते हा सन्मान देण्यात येणार असून, या कार्यक्रमाचे आयोजन 'आफ्टरनून व्हॉइस'च्या संस्थापक व संपादक डॉ. वैदेही ताम्हण यांच्या वतीने करण्यात आले आहे. या पुरस्काराने वर्षानुवर्षे विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या कार्याचा सन्मान करत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. बाळासाहेब ठाकरे, बाबासाहेब पुरंदरे, भारतरत्न लता मंगेशकर, आशा भोसले, पं. हृदयनाथ मंगेशकर, शरद पवार, प्रकाश जावडेकर, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे, मनोज बाजपेयी, राम जेठमलानी, उज्ज्वल निकम, पंडित बिरजू महाराज, प्रभा अत्रे, डॉ. कनक रेळे, बप्पी लाहिरी, अण्णा हजारे, बाबा आमटे, मंदाताई आमटे, स्वामी तेजोमयानंद, आचार्य डॉ. लोकेश मुनी, डॉ. तात्यासाहेब लहाने यांसह अनेक दिग्गज व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. अशा प्रतिष्ठित यादीत दत्ताभाऊ बारगजे यांचा समावेश होणे ही त्यांच्या सेवाकार्याची महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे. दत्ताभाऊ यांनी गेल्या २२ वर्षांपासून आनंदग्रामच्या माध्यमातून गरजू, बाधित मुले व महिलांसाठी केलेले कार्य अत्यंत मोलाचे असून, या पुरस्कारामुळे त्यांच्या सेवाकार्याला अधिक व्यापक ओळख मिळाली आहे.

# दुष्काळी आष्टीला संजीवनी देणारे 'जलनायक' खुटेफळ साठवण तलावाचे शिल्पकार अशोक खेडकर

**शरद रेडेकर । आष्टी**

**दुष्काळ हा आष्टीच्या मातीचा जणू शापच. वर्षानुवर्षे पाण्याच्या थेंबासाठी आसुसलेला शेतकरी, आभाळाकडे डोळे लावून बसलेली शेती आणि हतबल झालेलं ग्रामीण जीवन हीच ओळख बनली होती या भागाची. पण इतिहास सांगतो, प्रत्येक अंधाराला एक प्रकाश असतो आणि आष्टीच्या या अंधाऱ्या दुष्काळी वास्तवात प्रकाश बनून उभे राहिले ते उपअभियंता अशोक खेडकर.**



अधिकारी असणे आणि 'माणूस' असणे यात जमीन-आस्मानाचा फरक असतो. पद, सत्ता आणि अधिकार याच्या आड लपून बसणाऱ्या यंत्रणेत खेडकर यांनी मात्र वेगळी वाट निवडली जनतेच्या विश्वासाची. त्यांनी फाईलपेक्षा शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणी वाचले आणि त्यातूनच जन्माला आला खुटेफळ साठवण तलावाचा संकल्प!

**ध्येय एकच पाणी!**

२०१० साल. आष्टी उपसा सिंचन योजनेत रुजू झाल्यावर खेडकर यांनी सर्वप्रथम वास्तव पाहिले कोरडी जमीन, ओसाड शिवार आणि पाण्यासाठीची जीवघेणी झुंज. इथेच त्यांनी ठरवले, ''हा भाग बदलायचाच!'' पण हा प्रवास सोपा नव्हता. खुटेफळ प्रकल्पाच्या सुरुवातीलाच प्रकल्पग्रस्तांचा तीव्र विरोध, सर्वेक्षणाला अडथळे, अगदी दगडफेकीसारखे प्रसंगही त्यांच्या वाट्याला आले. अनेकांनी हात टेकले असते पण खेडकर नाही. कारण त्यांच्या डोळ्यासमोर एकच चित्र होतं हिरवागार आष्टी!

**संघर्ष, चिकाटी आणि दिल्लीपर्यंतचा लढा**

१५ जुलै २०१० रोजी प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली. काही वर्षे काम वेगात झाले, पण २०१३ मध्ये पर्यावरण परवानगीच्या अभावामुळे सर्व काही ठप्प! हीच खरी कसोटी होती. अनेक प्रकल्प इथेच गाडले जातात पण खेडकरांनी हार मानली नाही. त्यांनी थेट दिल्ली गाठली. मंत्रालयाच्या दालनात २५-३० बैठका घेत, प्रत्येक अधिकाऱ्याला या प्रकल्पाचं महत्त्व पटवून दिलं. हा लढा फक्त कागदोपत्री नव्हता तो आष्टीच्या भवितव्याचा होता! आणि अखेर २ मार्च २०२० परवानगी मिळाली! हा फक्त एक निर्णय नव्हता, तर आष्टीच्या भवितव्याला मिळालेला नवा श्वास होता.

**कोरोनातही न थांबलेलं काम**

जग थांबलं होतं, पण खेडकर नाही! कोरोनाच्या संकटातही त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत १९० हेक्टर भूसंपादन शांततेत पूर्ण केलं. आज प्रकल्पाचे ६० टक्के काम पूर्ण झाले असून, पहिल्या टप्प्यात ८१४७ हेक्टर क्षेत्राला पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ही केवळ आकडेवारी नाही हा हजारो शेतकऱ्यांच्या आयुष्याचा बदल आहे!

**अधिकारी नव्हे, विचारवंत**

खेडकर यांचं व्यक्तिमत्त्व केवळ अभियांत्रिकीपुरतं मर्यादित नाही. संत विचारांचा प्रभाव, अंधश्रद्धेविरोधी भूमिका आणि समाजप्रबोधनाची जाणीव हे त्यांच्या विचारांचे आधारस्तंभ आहेत. ''लग्नातील दिखावा टाळा, शिक्षणावर खर्च करा'' हा त्यांचा संदेश आजच्या समाजाला जागवणारा आहे.

**कुटुंबाचा आधार यशाची ताकद**

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे कुटुंबाची ताकद असते, हे त्यांनीही सिद्ध केलं. पत्नी आणि चिरंजीव ॲड. प्रतिक खेडकर यांची साथ त्यांच्या प्रत्येक संघर्षात उभी राहिली.

**सन्मान पण तो अपुरा!**

पुण्यातील यशदा संस्थेत 'उत्तम प्रशासक पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव होत आहे. पण खरं सांगायचं तर, हा सन्मान अपुरा आहे कारण खेडकरांनी केवळ प्रकल्प उभारला नाही, तर आष्टीच्या मातीला जीवन दिलं! आज जेव्हा खुटेफळ तलावाचं पाणी शिवारात झिरपतं, तेव्हा प्रत्येक थेंब एकच गोष्ट सांगतो ''एका माणसाच्या जिद्दीने इतिहास बदलू शकतो!'' अशोक खेडकर हे नाव आता केवळ एक अधिकारी नाही

# अनोळखी इसमाचा मृत्यू; ओळख पटवण्याचे पोलिसांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोलापूर-धुळे महामार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एका अनोळखी इसमाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना २८ एप्रिल २०२६ रोजी घडली असून, संबंधित मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी नागरिकांना आवाहन बीड ग्रामीण पोलीसांनी केले आहे.**

या बाबत, सरकारी दवाखाना, बीड येथुन एम.एल.सी क्र.५२४६ दि. २८-०४-२०२६ अन्वये प्राप्त झाली की, बीड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत सोलापुर धुळे माहामार्ग रोडवर एक अनोळखी इसम वय-३५ ते ४० वर्ष नाव गाव माहीत नाही. यास अज्ञात वाहनाने धडक देवुन त्यांचे अंगावरुन गाडी गेली असावी. त्यामुळे सदर अनोळखी इसमाच्या प्रेताचा चेंदामेंदा झालेला आहे. सदरील मृत इसमाची अद्याप ओळख पटलेली नसून, पोलिसांकडून ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. संबंधित मृत इसमाच्या अंगावर नाईट पॅन्ट असून त्यावर इंग्रजीत '' '' असे अक्षर दिसत आहे. तसेच त्याने निळ्या रंगाचे कपडे परिधान केले असून पायात ''' कंपनीचे सँडल असल्याचे दिसून येत आहे. या घटनेप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, संबंधित मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. या बाबत काही माहिती असल्यास किंवा कोणी मिसींग किंवा कसे असेल बीड ग्रामीण पोलीस स्टेशन फोन क्र. ०२२४४२, ०२२२४२२ चौकशी अमंलदार मो. क्र.९८२२३४२०८२, प्रभारी अधिकारी मो.न. ७७२२०३५२०९ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन बीड ग्रामीण पोलिसांनी केले आहे.

## पान १ वरून...

### उत्तर प्रदेशच्या धर्तीवर राज्यातही

कंपनी ज्या खतांची निर्मिती करते त्याच खताची विक्री त्यांना करता येते हाच कायदा महाराष्ट्रात लागू करणार आहोत. या निर्णयामुळे खत पुरवठा साखळीत सुसूत्रता येईल आणि शेतकऱ्यांना थेट उत्पादक कंपन्यांकडून दर्जेदार खते मिळणे सोपे होईल याबाबत लवकरच कार्यवाही करू. शेजारील राज्यातून येणारे अप्रमाणित एचटीबीटी कपाशी बियाणे प्रतिबंधित होण्याबाबत कडक कारवाई करण्याबाबत केंद्राला प्रस्ताव देऊ आणि गृह विभागाला तसेच जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस विभागाला पत्र देण्यात येईल व कडक कारवाई करू. केंद्र शासनाने बियाणांच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या संनियंत्रणासाठी साथी पोर्टल विकसित केले आहे. साथी पोर्टल हे बियाणे उत्पादक व पुरवठादार कंपनीस्तरापर्यंत राबवविणे ही सर्वांसाठीची यंत्रणा चांगली आहे याचा वापर सर्वांनी करावा. विक्रेत्यांना येणाऱ्या अडचणींबाबत नेहमीच शासन सकारात्मक भूमिका घेण्यात येईल.या पोर्टलबाबत पंधरा दिवसात प्रशिक्षण देवू यामध्ये प्रशिक्षणासाठी आवश्यकता वाढल्यास कालावधी वाढवू, विक्रेत्यांच्या अडचणीवर मार्ग काढू असेही ते म्हणाले.

---------------

### मस्साजोग सरपंचपदाच्या निवडणुकीत

ठेवल्याने पोटनिवडणुकीसाठी मतदान झाले होते. मस्साजोग येथे नेहमीच शांततेत मतदान प्रक्रिया पार पडत असल्याचे सांगण्यात येते. मंगळवारीही मतदान प्रक्रिया शांततेतच पार पडेल असे वाटत होते, परंतु मतदान केंद्राबाहेर दोन गट आमनेसामने आल्याने काही वेळ गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले होते, मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने परिस्थिती नियंत्रणात आली. मस्साजोगचे ४४ वर्षीय तत्कालीन सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर २०२४ मध्ये निर्घृण हत्या करण्यात आली होती. ज्यामुळे संपुर्ण राज्यात खळबळ उडाली होती.

-------------

### एक्झिट पोल ;प.बंगालमध्ये

पारड्यात ४० टक्के मतं पडतील. त्यामुळे, एक्झिट पोलनुसार दोन्ही पक्षांमध्ये तगडी टक्कर असून भाजपची आघाडी होत असल्याचा अंदाज आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत २३ एप्रिल रोजी १५२ जागांच्या पहिल्या टप्प्यात विक्रमी ९३ टक्के मतदानाची नोंद झाली होती. त्यानंतर, आज १४२ जागांच्या दुसऱ्या टप्प्यासाठी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ८९.९९ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. त्यामुळे, राज्यात दोन्ही टप्प्यातील एकूण सरासरी ९२ टक्क्यापर्यंत जाऊ शकते. त्यामुळे, वाढीव मतदान, झेन जी मतदार यांचा कौल भाजपच्या बाजुने असल्याचा अंदाज राजकीय विशेषज्ञ लावत आहेत. दरम्यान, २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जींच्या टीएमसीने २१५ जागा जिंकल्या होत्या. तर, भाजपला ७७ जागांवरच समाधान मानावे लागले होते. त्यामुळे, यंदाच्या निवडणुकीकडेही देशाचे लक्ष लागले आहे. गत निवडणुकीत काँग्रेस आणि डावे पक्ष खातंही खोलू शकले नाहीत. मात्र, यंदाच्या निवडणुकीत त्यांना ६ ते ७ जागा जिंकता येतील, असा अंदाज आहे.

------------

### वाळू धोरण २०२५ मध्ये

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचाही समावेश असेल. विशेषतः कोकण विभागात, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना त्यांच्या कार्यक्षेत्राला लागून असलेल्या दुसऱ्या तालुक्यात किंवा जिल्ह्यातही कारवाई करण्याची मुभा देण्यात आली आहे. नदी आणि खाडी पात्रातील वाळू गटांसाठी भौगोलिक परिस्थितीचा विचार करून ई-लिलाव पद्धत राबवली जाईल. या लिलावाचा कालावधी १ वर्ष किंवा वाळू साठा संपेपर्यंत (यापैकी जे आधी घडेल) इतका असेल. महत्त्वाचे म्हणजे, एखाद्या कारणास्तव उत्खनन करता न आल्यास लिलाव धारकाला मिळणारा परतावा हा कोणत्याही व्याजाशिवाय दिला जाईल, अशी अट आता करारनाम्यात असणे बंधनकारक करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यातील वाळू धोरणाच्या अंमलबजावणीसाठी वेळापत्रकात बदल करायचा असल्यास, ते विभागीय आयुक्तांच्या मान्यतेने तसे करू शकतील. ही सुधारित नियमावली संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात आली असून यामुळे वाळू उपशातील गैरप्रकारांना आळा बसेल.

-------------

### महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण

संधीची निर्मिती होईल. राज्यभरात एआयच्या संधीचे संतुलन साधण्यासाठी सहा एआय-उत्कृष्टता केंद्र स्थापन होणार आहेत. याशिवाय पाच एआय इनोव्हेशन सिटीजची स्थापना होणार आहेत. तसेच, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या प्रख्यात संस्थेत भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापनेचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या कायमस्वरूपी अध्यासनाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने डॉक्टरेटसाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे. राज्यात तीनशे कोटी वृक्ष लागवडीकरिता महत्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम होणार आहे. या पायाभूत सुविधा उपक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी व सनियंत्रण यासाठी हा आयोग काम करणार आहे. राज्यातील हरित ऊर्जेचा वापर आणि पारेषण क्षमतेच्या अधिक बळकटीकरणासाठी मॅजेस्टिक (महाराष्ट्र ॲक्सलरेटिंग ग्रीन एनर्जी अँण्ड स्टोरेज टेक्नॉलॉजीज इंटिग्रेशन इन कनेक्टेड ग्रीड) योजना राबविण्यात येणार आहे. उच्च माध्यमिक परिक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मिळणार आहे.

------------

### ठाकरे यांच्याकडून विधानपरिषदेसाठी

उपनेत्या सुषमा अंधारे यांचेही नाव आघाडीवर होते. मात्र, त्यांना संधी मिळाली नाही. भाजपने आपल्या ६ उमेदवारांची नावे जाहीर केल्यानंतर महाविकास आघाडी आणि शिंदेंच्या शिवसेना, अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवार कोण याची उत्सुकता सर्वांना होती. त्यातच, आज ठाकरेंनी आपला उमेदवार जाहीर करत अंबादास दानवेंना दुसऱ्यांदा संधी दिली. ठाकरेंच्या शिवसेनेकडून सुषमा अंधारे यांचेही नाव आघाडीवर होते. विशेष म्हणजे दोनच दिवसांपूर्वी त्यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरेंची भेट घेतल्याची देखील चर्चा होती. त्यामुळे, अचानक त्यांची नावाची घोषणा होईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, ठाकरेंकडून अंबादास दानवेंचे नाव जाहीर करण्यात आले आहे. त्यानंतर, सुषमा अंधारेंनी एका ओळीत आणि व्हिडिओतून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आमदारकी, खासदारकी आपल्यावरून १०० वेळा कुर्बान, असे म्हणत सुषमा अंधारे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंसमवेतचा व्हिडिओ शेअर करत, उद्धव ठाकरेंशी असलेले नातेच आपल्यासाठी सर्वस्व असल्याचे त्यांनी आपल्या पोस्टमधून सूचवले आहे. उद्धव ठाकरेंना राखी बांधतानाचा व्हिडिओ सुषमा अंधारे यांनी शेअर केला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून उद्धव ठाकरे यांच्याऐवजी अंबादास दानवे यांना उमेदवारी दिल्याने आघाडीत बिघाड झाल्याचे पाहायला मिळत आहे. उद्धव ठाकरेंच्या या निर्णयावर काँग्रेस पक्षश्रेष्ठी नाराज असल्याची माहिती आहे. त्यातूनच, काँग्रेस विधानपरिषदेत आपला उमेदवार देणार असल्याची माहिती पुढे येत आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ सध्या दिल्लीत असून पक्ष श्रेष्ठींशी चर्चा करून उमेदवाराचे नाव जाहीर करणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

------------

### गॅस संकट आणखी

शक्यता व्यक्त केली जात आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे हॉर्मुझची सामुद्रधुनी हा अत्यंत महत्त्वाचा समुद्री मार्ग जवळपास बंदच झाला आहे. जगातील मोठ्या प्रमाणातील तेल आणि गॅस वाहतूक याच मार्गातून होते. त्यामुळे या मार्गावर निर्माण झालेल्या अडथळ्याचा परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर झाला आहे. पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन्ही देशांमध्ये चर्चेचे प्रयत्न झाले, मात्र त्यातून कोणताही तोडगा निघाला नाही. परिणामी मध्यपूर्वेतून होणारा तेल आणि गॅस पुरवठा विस्कळीत झाला आहे. भारतामध्ये घरगुती वापरासाठी एलपीजी हा अत्यंत महत्त्वाचा इंधन स्रोत आहे. सध्या अनेक शहरांमध्ये गॅस सिलेंडरसाठी ग्राहकांना प्रतीक्षा करावी लागत असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. काही भागांमध्ये लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे. सरकारकडून देशात पुरेसा साठा असल्याचा दावा केला जात असला तरी आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे परिस्थिती अधिक बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जुआयमा सुविधा केंद्रातून जागतिक एलपीजी निर्यातीपैकी सुमारे ३.५ टक्के पुरवठा केला जातो. त्यामुळे या केंद्रातील अडचणीचा परिणाम जागतिक बाजारावर होत आहे. विशेषतः प्रोपेन आणि ब्यूटेनच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याने एलपीजीचे दर वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, अनेक देश आता पर्यायी पुरवठादार शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र अचानक वाढलेल्या मागणीमुळे दरांमध्ये मोठी वाढ होऊ शकते.

------------

### दाभोळकर हत्या प्रकरणातील

अजय गडकरी आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने त्याला ५० हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर जामीन मंजूर केला. सरकारी पक्षाने न्यायालयाला विनंती केली होती की, आपल्या या आदेशाच्या अंमलबजावणीला स्थगिती द्यावी, परंतु न्यायालयाने ती विनंती फेटाळून लावली. कळसकरवर कम्युनिस्ट नेते आणि विचारवंत गोविंद पानसरे यांच्या हत्येप्रकरणीही खटला सुरू आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये उच्च न्यायालयाने त्याला त्या प्रकरणातही जामीन मंजूर केला होता. दाभोळकर हत्या प्रकरणातही जामीन मिळाल्यामुळे जामिनाशी संबंधित कायदेशीर औपचारिकता पूर्ण केल्यानंतर कळसकर आता तुरुंगातून बाहेर येऊ शकेल. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली होती. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास स्थानिक पोलिसांनी केला होता. परंतु दाभोळकर यांची कन्या मुक्ता दाभोळकर यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमुळे, २०१४ मध्ये या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्यात आला. १० मे २०२४ रोजी सत्र न्यायालयाने सचिन अंदुरे आणि शरद कळसकरला दाभोळकरांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवून त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. तथापि, पुराव्यांच्या अभावामुळे न्यायालयाने वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांना या प्रकरणातून निर्दोष मुक्त केले होते.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६


# खांडे पारगाव येथे भीषण आग
## गंजी जळून खाक, गाय-वासराचा होरपळून मृत्यू

बीड । प्रतिनिधी

बीड शहराजवळील खांडे पारगाव येथे बुधवारी दुपारी भीषण आग लागून शेतकरी रमेश आमटे आणि सुनिल आमटे यांच्या घरा शेजारील कडव्याच्या गंजीचा राखरांगोळी झाला. आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने शेजारी बांधलेले गाय वासरू यांचा होरपळून मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास अचानक गंजीला आग लागली. उन्हाळ्याची तीव्रता व कोरडे वातावरण यामुळे आगीने झपाट्याने फैलाव घेतला. काही मिनिटांतच ज्वाळांनी संपूर्ण गंजीला वेढा घातला. आग वाढत असल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी तत्काळ अग्निशमन दलाला माहिती दिली; मात्र गाडी वेळेत उपलब्ध न झाल्याने आगीवर नियंत्रण मिळवणे कठीण झाले.

दरम्यान, आगीने जवळपास चार ते पाच किलोमीटर परिसरातील शेतांपर्यंत धुमाकूळ घातला. वाऱ्याच्या वेगामुळे ज्वाळा अधिकच भडकल्या आणि परिसरातील पिके व साठवलेले कडब्याचे ढीग धोक्यात आले. ग्रामस्थांनी पाण्याच्या टाक्या, मोटारी आणि उपलब्ध साधनांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. उशिरापर्यंत आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू होते.



या आगीत शेतकरी आमटे यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून जनावरांच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती महसूल प्रशासनाला देण्यात आली असली तरी उशिरापर्यंत पंचनामा करण्यासाठी एकही कर्मचारी घटनास्थळी दाखल झाला नव्हता, अशी ग्रामस्थांची तक्रार आहे. दरम्यान, या घटनेमुळे ग्रामीण भागातील अग्निसुरक्षेच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन यंत्रणा तत्पर असणे गरजेचे असल्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. प्रशासनाने तत्काळ मदत जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला दिलासा द्यावा, अशीही मागणी जोर धरत आहे.

## थोडक्यात

### उद्यापासून योगेश्वरीत महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीरास प्रारंभ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास,स्वा.रा.ती. महाविद्यालय,श्रीमती गो.कु.यो.कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ मे ते ०८ मे पर्यंत चालणाऱ्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन ०१ मे रोजी श्रीमती गो कु यो कन्या विद्यालयात होत असून अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर हे असून उद्घाटक म्हणून कोल्हापुर येथील लेखक समुपदेशक ऍड. प्रा.श्रीकांत माळकर उपस्थित राहणार आहेत.त्यांचे यशोगाथा जिद्दी व ध्येयवेड्या माणसांची याविषयावर व्याख्यान होणार आहे या शिबीरात शनिवार ०२ मे रोजी मुंबई डॉ. मधुबाला जोशी(चिंचाळकर) या अदभूत अंटार्क्टिका (अंटार्क्टिका संशोधन मोहिम ) विषयावर बोलणार आहेत शुक्रवार ०३ मे रोजी लातुर येथील सामाजिक कार्यकर्त्या आशा सरवदे(भिसे) ह्या महिला सक्षमीकरण या विषयी मनोगत व्यक्त करतील ०४ मे सोमवार डॉ.अरूणा केंद्रे ह्या महिलांचे आरोग्य व बदलती जीवन शैली याविषयी भावना व्यक्त करतील तर मंगळवार ०५ मे ला सोलापुर येथील समीर गायकवाड हे वाचन घडविते सामाजिक वर्तन याविषयी तर बुधवार ०६ मे लातुर येथील सामाजिक कार्यकर्त्या सुनिता आरळीकर ह्या माझी आत्मकथार हिरकणीचं बिऱ्हाड या विषयी तर ०७ मे रोजी लातुरच्या ऍड.वैशाली लोंढे(यादव) महिलांची सुरक्षा आणि सामाजिक संस्था या विषयावर मत व्यक्त करणार आहेत

०८ मे रोजी शिबीराचा समारोप अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे (जिरंगे) तसेच योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांच्या उपस्थितीत होईल. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन यो.शि.संस्था,योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे न्यास, स्वा.रा.ती.महाविद्यालय, श्रीमती गो.कु.यो.कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

### करचुंडी येथे मकतुमशहा भाउदीन यात्रा उत्सवाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

मौजे करचुंडी ता. जि. बीड येथे प्रति वर्षी प्रमाणे याही वर्षी मकतुमशाहा भाउदीन यात्रा उत्सव साजरा होणार आहे. हा उत्सव सर्व जाती धर्मातील लोक मोठ्या उत्साहाने साजरा करतात. हा पीर सर्वांच्या नवसाला पावणारा आहे, असा अनुभव सर्वांना आहे.

करचुंडी गावची मांडणी तशी फार सुंदर आहे कारण गावच्या पूर्वेला नदी आहे पश्चिमेला नदी आहे. या नद्यांचा संगम जेथे होतो त्याच ठिकाणी या पिराचे सुंदर असे दर्गा देवस्थान आहे. या पिराची महती फार मोठी आहे या यात्रेमध्ये अनेक लोक उदर निर्वाहासाठी वेगवेगळ्या माध्यमातून दुकाने थाटून भरपूर कमाई करतात. हा यात्रा उत्सव सलग तीन दिवस चालतो.

यामध्ये पुढील कार्यक्रम होत आहेत दि. ३०.४.२०२६ रोजी संध्याकाळी ठीक ८:३० वाजता ढोल ताशा मध्ये घोडा सजवून संदल मिरवणूक होणार आहे. या कार्यक्रमाला सर्व गावची उपस्थिती असते दि. ०१.०५.२०२६ रोजी ताजी यात्रा या दिवशी पंचक्रोशीतील लोक येऊन आपला नवस फेडतात. तसेच रात्री कव्वाल्याचा बहारदार कार्यक्रम साजरा होत आहे याचा लाभ सर्व गावकरी घेत असतात. दिनांक ०२.०५.२०२६ रोजी कुस्त्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात होणार आहे. वरील सर्व कार्यक्रमाचा लाभ परिसरातील नागरिकांनी व गावकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आलेले आहे

### उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण

बीड । प्रतिनिधी

१ मे २०२६ महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६७ वा वर्धापन दिन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा येथील पोलीस कवायत मैदान येथे होणार आहे. मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा शुक्रवार दिनांक ०१ मे २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता होणार आहे.



या सोहळ्याच्या आयोजनाबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज एक बैठकीत आढावा घेतला. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासनचे शैलेश सूर्यवंशी आदींची या बैठकीस प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम स्थळावरील व्यवस्था त्याचप्रमाणे इतर आयोजन याबाबत यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. मुख्य ध्वजारोहण सकाळी ८.०० वाजता असल्याने इतर कार्यालयाने सकाळी ७.१५ वाजेपूर्वी ध्वजारोहण करणे किंवा मुख्य ध्वजारोहणानंतर ९.०० वाजेनंतर ध्वजारोहण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. मुख्य प्रशासकीय इमारत मुख्य प्रशासकीय इमारत येथील ध्वजारोहण सकाळी ६.४५ वाजता अप्पर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक यांच्या हस्ते होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय ध्वजारोहण सकाळी ७.१० वाजता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते होईल.


### जाहीर प्रगटन

मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह. दिवाणी न्यायाधीश, क, स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात, किरकोळ दिवाणी अर्ज १४८/२०२६ मिठु पि. रामकृष्ण उर्फ रामकिसन नागरगोजे व इतर विरुध्द कोणीही नाही. मार्फत ॲड. श्री. एस. आर. नागरगोजे.

अर्जदार :- १. मिठु पि. रामकृष्ण उर्फ रामकिसन नागरगोजे, वय ४८ वर्षे, धंदा खाजगी नोकरी, रा. येवलवाडी, ता. पाटोदा, जि. बीड. ह.मु.विष्णु पाटील चाळ, कल्याण रोड, नेअर शिवमंदिर, चिंधी मार्केट गोलवली, कल्याण डोंबिवली, ठाणे. २. प्रकाश पि. रामकृष्ण उर्फ रामकिसन नागरगोजे, वय ४१ वर्षे, धंदा खाजगी नोकरी, रा. सदर. ३. रामकृष्ण उर्फ रामकिसन पि. नामदेव नागरगोजे, वय ७९ वर्षे,धंदा घरकाम, रा.पिठ्ठी, ता.पाटोदा, जि.बीड.

विरूध्द

गैरअर्जदार :- कोणीही नाही.

मागणी अर्ज : **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत आश्राबाई भ्र. रामकृष्ण उर्फ रामकिसन नागरगोजे, रा. येवलवाडी, ता.पाटोदा, जि. बीड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी आश्राबाई भ्र. रामकृष्ण उर्फ रामकिसन नागरगोजे हे दिनांक ०६/०२/२०२४ रोजी येवलवाडी, ता.पाटोदा, जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत. तसेच मयताचे आईवडील दोघेही पूर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार क. ०१ व ०२ हे मयताचे मुले असुन अर्जदार क. ०३ हे मयताची पती आहेत. वरील सर्व अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत आश्राबाई भ्र. रामकृष्ण उर्फ रामकिसन नागरगोजे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २९ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९/०७/२०२६.

**आदेशावरुन,**
**स्वाक्षरित/-**

**स्वाक्षरित/-**
**क. लिपीक**

**(सहाय्यक अधिक्षक)**
**सह दिवाणी न्यायालय, क.स्तर,**
**पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.**


## छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान करणाऱ्यांवर कडक कारवाई करा; पाटोदा तहसीलदारांना निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल सातत्याने आक्षेपार्ह आणि अपमानकारक वक्तव्ये करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध आता संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर, अशा व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करून त्यांना महाराष्ट्रात येण्यास बंदी घालावी, या मागणीसाठी पाटोदा (जि. बीड) येथील तहसीलदारांना शिवप्रेमींच्या वतीने जाहीर निवेदन देण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून काही ढोंगी व्यक्तींकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान कार्याबद्दल चुकीची विधाने केली जात आहेत. या विधानांमुळे राज्यातील शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या असून, समाजात संभ्रम आणि अशांतता पसरवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे निवेदनात म्हटले



आहे. विशेषतः धीरेंद्र शास्त्री आणि स्वामी आनंद स्वरूप यांसारख्या व्यक्तींच्या विधानांचा उल्लेख करत, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या:

कायदेशीर कारवाई: महाराजांचा अवमान करणाऱ्यांवर तातडीने कठोर कायदेशीर पावले उचलली जावीत.

महाराष्ट्र बंदी: अशा व्यक्तींना महाराष्ट्राच्या पावन भूमीत पाऊल ठेवण्यास कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी.

गुन्हा नोंद: सामाजिक शांतता भंग केल्याप्रकरणी संबंधित व्यक्तींवर गुन्हे नोंदवून त्यांना कठोर शिक्षा द्यावी.

हे निवेदन तहसीलदार साहेबांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनाही प्रत (कॉपी) म्हणून पाठवण्यात आले आहे. ''छत्रपतींची तुलना जगातील कोणाशीही होऊ शकत नाही. राज्याची अस्मिता असलेल्या महाराजांचा अपमान आम्ही सहन करणार नाही,'' अशा भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केल्या. या निवेदनावर गणेश कवडे, विष्णुपंत घोलप, एल आर जाधव, शहाजी पवळ, संदीप जाधव ,बाबा तिपटे,राहुल जाधव, मुकुंद शिंदे, बालाजी सव्वाशे, ॲड. सय्यद वहाब, अँड. पठाण जब्बार, इमरान नूर, सज्जाद भाई सय्यद, सतीश गरजे, सय्यद शपू शेठ ,विकास जाधव, महादेव जाधव ,लखुळ वीर , राऊत ,निलेश जावळे, आबासाहेब भोसले, स्वामी घुमरे, गंगाधर तांबे, सय्यद फकीरा, चांगदेव सव्वाशे ,संतोष जाधव, अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. जर प्रशासनाने यावर लवकर कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शिवप्रेमीं व मुस्लिम मावळ्याकडून देण्यात आला आहे.

### दिपाली आंधळे मरळवाडीच्या सरपंच

परळी । प्रतिनिधी

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या मरळवाडी ग्रामपंचायत पोट निवडणुकीचा समोर आला असून मरळवाडीत दिवंगत सरपंच बापू



आंधळेंच्या पत्नी दिपाली आंधळे ४३५ मतांनी विजयी विजयी झाल्या आहेत. दिपाली आंधळे यांनी विरोधक पद्मिनीबाई आंधळे यांचा पराभव केला. या निकालाची राज्यात जोरदार चर्चा होत आहे.

दिवंगत सरपंच बापू आंधळे यांच्या पत्नी दीपाली आंधळे यांनी विरोधक पदमीनबाई आंधळे यांचा ४३५ मतांनी पराभव केला. दोघींमध्ये अतिशय चुरशीची निवडणूक होईल, असे वाटले होते. मात्र दीपाली आंधळे यांनी विरोधक पदमीनबाई आंधळे यांचा तब्बल ४३५ मतांनी पराभव केल्याने निवडणूक एकतर्फी झाली, असे म्हणता येईल.

### अध्यक्षपदी सरपंच लक्ष्मी तांबे तर विशेष निमंत्रित सदस्यपदी पत्रकार प्रा खंडागळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियाना अंतर्गत पाटोदा तालुक्यातील तांबाराजुरी गावात ग्राम आरोग्य समितीची स्थापना करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठी व आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. या समितीच्या अध्यक्षपदी गावच्या सरपंच लक्ष्मी बापूराव तांबे यांची निवड करण्यात आली असून, विशेष निमंत्रित सदस्य म्हणून पत्रकार प्रा.सोमीनाथ खंडागळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या समिती मध्ये सचिव समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष भारती, उपाध्यक्ष म्हणून उपसरपंच ज्योती विलास तांबे,ग्राम पंचायत सदस्य म्हणून गणेश मधुकरराव तांबे,रमेश तांबे,महिला प्रतिनिधी स्वाती भालेराव,मागासवर्गीय प्रतिनिधी दीपक सोनवणे,पोलीस पाटील नेमाने भागवत, ग्रामपंचायत अधिकारी वाघुले,आशा स्वयंसेविका मंदाबाई तांबे,शिक्षक प्रतिनिधी हरिदास तांबे,अंगणवाडी कार्यकर्ती अमृता तांबे आदींची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

या समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे,जनजागृती करणे,आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे तसेच विविध आरोग्य उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येणार आहे. विशेषतः गरजू व वंचित घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्याचा समितीचा मुख्य उद्देश आहे. जन आरोग्य समितीच्या भूमिका व जबाबदाऱ्या परिसरातील आरोग्यविषयक समस्या ओळखून त्यावर उपाययोजना सुचविणे,नागरिकांमध्ये स्वच्छता व आरोग्याबाबत जनजागृती करणे, नियमित आरोग्य शिबिरे व तपासणी मोहिमा आयोजित करणे माता-बाल आरोग्य, लसीकरण आणि पोषणाबाबत मार्गदर्शन करणे शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे गरजू व वंचित घटकांना आरोग्य सेवा मिळवून देण्यासाठी मदत करणे स्थानिक आरोग्य केंद्रांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे व आवश्यक सूचना देणे असा उपक्रम असणार आहे.या समितीच्या माध्यमातून गावातील आरोग्य व्यवस्थेत सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास या समितीचे सचिव डॉ.सुभाष भारती यांनी व्यक्त केला.

## येणारा काळ आंबेडकर युगाचा असेल -विजय साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील भोपा येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा समन्वयक विजय दादा साळवे यांनी प्रभावी प्रतिपादन करत, ''आजचे युग आधुनिक असले तरी येणारा काळ हा आंबेडकर युग म्हणूनच ओळखला जाईल,'' असा ठाम विश्वास व्यक्त केला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना विजय साळवे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून ते बीड जिल्ह्यासह माजलगाव तालुक्यातील जवळपास प्रत्येक गावांमध्ये भीम जयंती उत्सव साजरा करत आहेत. या माध्यमातून त्यांनी बुद्ध, शिव, फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार केला आहे.

ते पुढे म्हणाले की, पूर्वीच्या काळात काही ठिकाणी भीम जयंती मिरवणुकीला विरोध, दगडफेक यांसारख्या घटना घडत असत. अशा प्रसंगांनाही सामोरे जात त्यांनी आंबेडकरी चळवळ अधिक जोमाने पुढे नेली. पंधरा वर्षांपूर्वी विरोधकांना प्रत्युत्तर देण्याची वेळ होती, मात्र आज परिस्थिती मोठ्या प्रमाणावर बदलली आहे.

ग्रामीण भागातील सर्व जाती-धर्मातील नागरिक मोठ्या प्रमाणावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना स्वीकारत आहेत. अनेक गावांमध्ये विविध समाजातील लोक स्वयंस्फूर्तीने जयंती उत्सवात सहभागी होत आहेत, ही सकारात्मक बदलाची नांदी असल्याचे त्यांनी नमूद केले. तरुणांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, आंबेडकरी चळवळीत कार्यरत तरुणांनी आता संघर्षापेक्षा संवादावर भर देऊन इतर समाजघटकांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करावेत. समन्वय, ऐक्य आणि परस्पर सन्मान यांच्या माध्यमातूनच डॉ. आंबेडकरांचे विचार गावागावात प्रभावीपणे पोहोचू शकतात.



''समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक सर्व समाजघटकांनी एकत्रितपणे केली, तरच खऱ्या अर्थाने 'आंबेडकर युग' साकार होईल,'' असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

या कार्यक्रमास आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश भाऊ घोडे, पीआरपीचे माजलगाव तालुका अध्यक्ष राकेश दादा साळवे, दादाराव तोडके, मारोती साळवे, पोलिस पाटील सत्यनारायण वाघचौरे, श्रीराम लंगे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन पद्माकर गायकवाड, अभिमान पट्टेकर, गौतम गायकवाड यांच्या सहकार्याने करण्यात आले. तसेच गावातील अनेक मान्यवर, नागरिक, बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### अहमदपूर-अहिल्यानगर

करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने ठेकेदारांचा बेजबाबदारपणा वाढल्याचा आरोप होत आहे.राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्त्यांची सिमेंट ब्लॉक कट पद्धतीने कायमस्वरूपी व दर्जेदार दुरुस्ती करावी, तसेच अपूर्ण काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.

### मुस्लिमांच्या विकास योजनांवर

करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली. अल्पसंख्याक तरुणांना आधुनिक शिक्षणाशी जोडण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. कौशल्य विकास, तंत्रज्ञानाधारित शिक्षण आणि रोजगाराभिमुख उपक्रमांद्वारे युवकांना सक्षम करण्यावर राज्य सरकारचा विशेष भर राहील, असे देखील स्पष्ट करण्यात आले अल्पसंख्याक पायाभूत सुविधां व इतर सर्व योजनाचा फायदा सर्वसामान्य नागरिकाना मिळून द्यावा असे निवेदन मा.उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अल्पसंख्याक विभाग जिल्हाध्यक्ष शेख निजाम यांनी दिले आहेत.

### मोबाईल शॉपी फोडणारा

फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे, हा गुन्हा कल्याण येथील सराईत गुन्हेगार रामनिवास गुप्ता याने केल्याची खात्रीशीर माहिती पोलीस पथकाला मिळाली. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी तातडीने एक विशेष पथक तयार करून आरोपीच्या शोधासाठी रवाना केले.

असा लागला छडा

पोलीस पथकाने ठाणे, मुंबई, गोवा आणि गुजरात राज्यांमध्ये आरोपीचा शोध घेतला. शेवटी तो दिवा (पूर्व), ठाणे येथे असल्याची माहिती मिळाल्यावर पथकाने सापळा रचून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने बीडमधील चोरीची कबुली दिली, तसेच चोरलेले मोबाईल एका त्रयस्त व्यक्तीकडे दिल्याचे सांगितले.

आरोपीच्या अधिक तपासात त्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील जिओमार्ट डिजिटल व मधु वाईन्स, तसेच पुणे ग्रामीण जिल्ह्यातील शिरूर येथील एस.एस. मोबाईल शॉपीमध्येही चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि सुशांत सुतळे, अंमलदार सोमनाथ गायकवाड, मारुती कांबळे, अर्जुन यादव, बाळू सानप, मनोज परजणे, अशफाक सय्यद, विकी सुरवसे आणि अतुल हराळे यांच्या पथकाने केली आहे.

### महिला आरक्षण विधेयकाला

आल्याची माहिती आयोजकांनी दिली.

यावेळी तहसील कार्यालयासमोर घोषणाबाजी करत काँग्रेस पक्षाच्या भूमिकेविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. महिला आरक्षणास समर्थन देत महिलांना राजकारणात समान प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

आंदोलनात शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शिवसेनेचे शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके, धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे जिल्हाध्यक्ष सर्जेराव महाराज काशीद, उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा , शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईज धोंडीराम जाधव, संतोष देवकते विलास नेमाने सुरेश नवले अशोक चोरमले वैजनाथ चव्हाण, सलीम आत्तार राजेश चव्हाण, सुधीर कुलकर्णी, अँड महेश कुमार, आदी पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या तसेच शिवसैनिक सहभागी झाले होते. तहसील प्रशासनाला यासंदर्भातील निवेदनही देण्यात आले.

### पांढरी येथे शेतातील

२० नोव्हेंबर २०२५ रोजी हा पंप बसविण्यात आला होता.

दि. २७ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११ वाजेपर्यंत सौर पंप व्यवस्थित होता. मात्र २८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता शेतात गेल्यावर पंपाच्या प्लेट्स, विहिरीतील मोटार, वायर व इतर साहित्य जागेवर दिसून आले नाही. यानंतर त्यांनी परिसरात शोध घेतला असता साहित्य आढळून न आल्याने अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास चोरी केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. आष्टी तालुक्यात सौर पंपाच्या मोटर व त्यांच्या वायरित होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून अनेक ठिकाणी आशा चोरी झाल्याच्या घटना ऐकण्यास मिळत आहेत यावर तात्काळ उपायोजना करण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे

या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल असून भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे .पुढील तपास हे. कॉ. तांदळे करत आहेत.

### विद्यार्थ्यांनो ज्ञानसाधना करून

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी संविधानाच्या रूपात समानते सोबतच आम्हांला आमच्यामध्ये सकारात्मक बदल घडवून आणून घेण्याची संधी दिली आहे. विद्यार्थ्यांनी क्रांतीची ही धगधगती ज्वाला आपल्या मस्तिष्कात कायम तेवत ठेवली पाहिजे असे सांगत जिथे अन्याय होतो त्या विरूद्ध संघर्षासाठी समाजाने सज्ज राहावे असे आवाहन डॉ.इंगोले यांनी केले. कार्यक्रमात विविध मान्यवरांनीही आपली मनोगते व्यक्त करीत डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण केले. त्यांच्या सामाजिक समतेच्या, बंधुत्वाच्या आणि शिक्षणाच्या विचारांचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसह गावातील बहुसंख्य नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी सचिन आचार्य, बालाजी आचार्य, अजय रोकडे, दीपक आचार्य, करण आचार्य, सुशिल आचार्य, रणजित शिंदे, माधव शिंदे, संघर्ष आचार्य, शंकर वाघमारे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन आचार्य यांनी केले तर उपस्थितांचे आभार जयजीत शिंदे यांनी मानले.

# मुक्त व्यापार करारांमध्ये शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य

## कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांचा पुनरुच्चार

दिल्ली / वृत्तसंस्था

भारत आणि इतर देशांदरम्यान झालेल्या सर्व मुक्त व्यापार करारांमध्ये शेतकरी आणि देशाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे, असा पुनरुच्चार केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारतातील शेतीला अमेरिकेला विकल्याचा आरोप केला होता. त्यावर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी (काँग्रेसने) काहीच केले नाही. त्यांनी आमच्या शेतकऱ्यांना आणि शेतीला उद्ध्वस्त केले, असा आरोप कृषिमंत्र्यांनी केला. ''मी ठामपणे सांगू इच्छितो, आतापर्यंत जे काही द्विपक्षीय मुक्त व्यापार करार झाले आहेत, त्यात सर्व भारतातील जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले आहे,'' असे चौहान यांनी येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले.



अनेक देशांशी मुक्त व्यापार करार करण्यात आले आहेत. परंतु अमेरिकेसोबत अद्याप करार झाला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. न्यूझीलंड सोबतच्या द्विपक्षीय मुक्त व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर देशातील सफरचंद उत्पादकांच्या चिंतेविषयी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना चौहान म्हणाले की, ही आयात आम्ही ठेवलेल्या अटीवर केली जात आहे. मी इथे सफरचंद उत्पादकांची भेट घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेत आहे, असेही ते म्हणाले.

देशात सफरचंदांचा २६ लाख टनांवर खप, देशांतर्गत उत्पादन २० लाख टन भारतात सफरचंदांचा खप २६ लाख टन इतका आहे. पण त्या तुलनेत देशात सुमारे २० लाख टन सफरचंदांचे उत्पादन होते. यामुळे देशांतर्गत मागणीच्या पूर्ततेसाठी आजही परदेशातून ६ लाख टन सफरचंदाची आयात करावी लागते. सफरचंदांची आयात थांबवण्यासाठी देशांतर्गत उत्पादन वाढ करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. परंतु, जोपर्यंत आयात होईल ती आमच्या अटींवरच होईल, त्यांच्या नाही. आपल्या शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक केली जात आहे. याचाच अर्थ, आयात वस्तूंचा दर आपणच ठरवतो. भारताने सफरचंदांवर आयात शुल्क लागू केले आहे, असे त्यांनी नमूद केले. दरम्यान, कृषिमंत्री चौहान यांच्या उपस्थितीत श्रीनगर येथून राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियानांतर्गत २४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना ४,५६८ कोटी रुपयांची रक्कम हस्तांतरित करण्यात आली.

# बरसीम गवत दूभत्या जनावरांसाठी फायदेशीर



भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथे शेतीसोबतच लोक पशुपालनही मोठ्या प्रमाणावर करतात. दूध आणि दुग्धजन्य पदार्थ विकून लोक चांगला नफा कमावतात. मात्र, जनावरांमध्ये दूध वाढण्यासाठी त्यांना पोषक आणि संतुलित आहारही द्यावा लागतो, ज्यावर मोठा खर्च होतो. पण, प्राणीही हिरवे गवत मोठ्या आवडीने खातात. त्यामुळे त्यांची दुधाची क्षमताही वाढते. अशा परिस्थितीत, विशिष्ट प्रकारचे गवत जनावरांना देऊन तुम्ही तुमच्या गुरांचे अधिक दूध मिळवू शकता.

गुरांची दूध देण्याची क्षमता वाढते :खरं तर, शेतकरी आणि पशुपालकांना भारतात दूध देण्याच्या गुरांच्या क्षमतेबद्दल खूप काळजी आहे. गुरांचे अधिक दूध काढण्यासाठी काही जण त्यांच्यावर डॉक्टरांकडून उपचार करून घेतात तर काही जण वेगवेगळ्या प्रकारची इंजेक्शने देतात. मात्र, या इंजेक्शन्सने काही काळ जनावरांचे दूध वाढले तरी त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. त्यामुळे गुरांचा मृत्यूही होऊ शकतो. अशा परिस्थितीत बरसीम, जिरका आणि नेपियर यांसारखे हिरवे गवत खाऊन तुम्ही तुमच्या जनावरांची दूध देण्याची क्षमता वाढवू शकता. पशुवैद्यकांच्या मते, बरसीम गवत दुभत्या जनावरांसाठी खूप फायदेशीर आहे. यामध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक आढळतात. हे खाल्ल्याने गुरांची पचनक्रियाही चांगली राहते. यासोबतच बरसीम गवताच्या सेवनाने गाय आणि म्हशीची दूध देण्याची क्षमता वाढते. विशेष म्हणजे बरसीम गवताची लागवड शेतकरी करतात. वेळेवर पाणी द्यावे लागते. हिरवे गवत खाल्ल्याने प्राणी निरोगी राहतात असे म्हणतात.

गुरांची दूध देण्याची क्षमता वाढते : बरसीम व्यतिरिक्त जिरका गवत देखील दुभत्या गुरांसाठी गुणकारी आहे. त्यामुळे जनावरांची दूध देण्याची क्षमताही वाढते. जिरका गवताचे वैशिष्ट्य म्हणजे त्याला कमी सिंचन लागते. तसेच ते कमी वेळात तयार होते. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर हे महिने त्याच्या लागवडीसाठी उत्तम मानले जातात. याशिवाय गुरांसाठी आवश्यक असलेल्या जिरका गवतामध्ये जीवनसत्त्वेही मुबलक प्रमाणात आढळतात.

५० दिवसात होते तयार : गवत उसासारखे दिसते. हे पशुखाद्यासाठीही अत्यंत पौष्टिक मानले जाते. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे पीक अवघ्या ५० दिवसांत तयार होते. गुरे ते खातानाच जास्त दूध देऊ लागतात.

# क्षारयुक्त पाण्याने सिंचन करताना काय काळजी घ्यावी ?

उन्हाळा लागल्याने पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. त्यामुळे आपण बोअरवेल, विहीर यांवर अवलंबून राहतो. परंतु हे पाणी अधिक क्षारयुक्त असते. असे पाणी थेट वापरल्यास जमिनीचा पोत बिघडतो, पिकांची वाढ कमी होते आणि उत्पादन घटते. त्यामुळे योग्य उपाययोजना करूनच या पाण्याचा वापर करणे गरजेचे आहे.

सुरुवातीला, जमिनीची गुणवत्ता टिकवण्यासाठी सेंद्रिय खतांचा जास्त वापर करावा. शेणखत, कंपोस्ट, गांडूळ खत यामुळे माती भुसभुशीत राहते आणि क्षारांचा दुष्परिणाम कमी होतो. पिकांची लागवड करताना वरंब्यांच्या बाजूला लागवड करावी, यामुळे क्षारांचा थेट परिणाम मुळांवर होत नाही. शेतात पाण्याचा निचरा व्यवस्थित होणे खूप महत्त्वाचे आहे. अतिरिक्त पाणी साचू नये म्हणून चर खोदावेत. तसेच सरीमध्ये पिकांचे अवशेष, काडी-कचरा किंवा पाचट टाकून आच्छादन केल्यास जमिनीत ओलावा टिकतो आणि क्षारांचा प्रभाव कमी होतो. तसेच आच्छादनामुळे पिकाची मुळे लवकर खराब होत नाहीत. पेरणी करताना बियाणे १५ ते २० टक्के जास्त वापरावे, कारण क्षारयुक्त पाण्यामध्ये बियाण्यांची उगवणक्षमता कमी होते. खतांच्या वापराबद्दल पाहताना याउलट होते. नत्रयुक्त खतांचा वापर शिफारशीपेक्षा थोडा म्हणजे तरी २५ टक्क्यांनी वाढवावा. पाणी देताना हलके पण वारंवार सिंचन करावे. एकदम जास्त पाणी देणे टाळावे. सिंचनासाठी स्प्रिंकलर किंवा ठिबक पद्धतीचा वापर फायदेशीर ठरतो. शक्य असल्यास खारट पाण्यात थोडे गोड/ साधे पाणी मिसळून वापरावे. एका आड एक सरी भिजवण्याची पद्धतही उपयुक्त आहे. पिकांची निवड करताना क्षार सहन करणारी पिके घ्यावीत. जसे, ऊस, कापूस, भात, ज्वारी, पालक, शुगरबीट, नारळ, बोर, खजूर, आवळा या पिकांची लागवड करावी. तर चारा पिकांमध्ये लसूणघास, बरसीम, होडस गवत, बरमुडा, करनाल गवत यांची लागवड करावी. जर पाणी खूपच खारट असेल, तर निलगिरी, बांबू, सुबाभूळ यांसारखी वृक्षशेती करणे अधिक फायदेशीर ठरते.



# रताळ्याच्या लागवडीतून मिळतो चांगला नफा

भारतीय शेतकरी आता पारंपारिक शेती सोडून अपारंपारिक शेतीकडे जात आहेत आणि त्यात यशस्वीही होत आहेत. शेतकरी रताळ्यांसह अनेक प्रकारची फळे आणि भाज्यांची लागवड करतात. रताळे हे दिसायला आणि चवीला बटाट्यासारखे आहे, पण त्यात बटाट्यापेक्षा जास्त गोडवा आणि स्टार्च आहे. याशिवाय रताळ्यामध्ये जीवनसत्त्वेही चांगल्या प्रमाणात आढळतात. याचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. यामुळे चेहऱ्यावर चमक येते आणि केसांची वाढ होते. रताळे लागवडीमुळे शेतकऱ्यांना चांगला नफा मिळू शकतो.

रताळे लागवडीची वेळ : रताळ्याची लागवड हे सदाहरित पीक आहे. ज्याचे उत्पादन शेतकऱ्यांना वर्षभर मिळू शकते. पण चांगल्या उत्पादनासाठी उन्हाळ्यात आणि पावसात लागवड केली जाते. झैद हंगामात शेतकरी जून ते ऑगस्ट दरम्यान त्याची रोपे लावतात. त्याच वेळी खरीप हंगामातील पिकासह त्याचे पीक तयार होते. डिसेंबर-जानेवारी महिन्यात धानाची दुसरी कापणी झाल्यानंतर शेतकरी पेरणी करतात.

रताळ्याच्या सुधारित जाती : रताळ्याच्या ४०० हून अधिक जाती असल्या तरी देशातील बहुतांश शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या जातींमध्ये पुसा गोल्डन, पुसा व्हाईट, कोकण अश्विनी, राजेंद्र गोड बटाटा-५, काळमेघ, श्री रत्न क्रॉस-४, श्रीभद्र या जातींचा समावेश आहे. श्री अरुण, श्री वरुण, श्री वर्धिनी, श्री नंदिनी आणि वर्षा यांचा समावेश आहे. रताळ्याच्या या सुधारित जाती ११० ते १२० दिवसांत तयार होतात



हवामान आणि माती : रताळयाच्या लागवडीसाठी चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. जी सेंद्रिय घटकांनी समृद्ध आहे. त्याच्या लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ५.८ ते ६.७ च्या दरम्यान असावी. रताळ्याच्या लागवडीसाठी सौम्य आणि समशीतोष्ण हवामान सर्वात योग्य आहे. त्याच्या लागवडीसाठी सर्वात योग्य तापमान २१ ते २७ अंश सेल्सिअस आणि पर्जन्यमान ७५ ते १५० सेंटीमीटर असावे.

लागवड अशी करावी : रताळ्याची लागवड करण्यासाठी प्रथम माती फिरवणाऱ्या नांगराने शेत नांगरून घ्यावे. काही दिवस उघडे सोडा जेणेकरून जमिनीतील कीटक, जुने पिकांचे अवशेष आणि तण नष्ट होतील. आता तुम्हाला हेक्टरी १८० ते २०० क्विंटल कुजलेले शेणखत शेतात टाकावे लागेल. यानंतर रोटाव्हेटरच्या सहाय्याने शेताची २ ते ३ वेळा नांगरणी करून माती भुसभुशीत करावी लागते. शेत तयार झाल्यानंतर, रताळे पेरा, त्याची रोपे रोपवाटिकेत तयार केलेल्या कलमांच्या स्वरूपात लावली जातात. रोपे एक महिना अगोदर तयार केली जातात, रोपवाटिकेत बिया पेरून द्राक्षांचा वेल तयार केला जातो.

वेल उपटून, तिची छाटणी करून शेतात लावली जाते. रताळ्याची रोपे शेताच्या कड्यांवर लावली आहेत. इतर वनस्पतींपासून त्याच्या रोपांचे अंतर सुमारे एक फूट असावे. रताळ्याच्या रोपांची २० सेमी खोलीवर पेरणी करावी. झाडे लावल्यानंतर ते सर्व बाजूंनी मातीने झाकले पाहिजे. हे सपाट जमिनीवर लावले जाते, म्हणून बेडमध्ये ओळी लावल्या जाऊ शकतात. ओळीपर्यंतचे अंतर सुमारे २ फूट ठेवावे.

रताळ्याच्या शेतीतून नफा : रताळ्याच्या सुधारित वाणांची योग्य कृषी पद्धती वापरून लागवड केल्यास त्यातून चांगला नफा मिळू शकतो. एका अंदाजानुसार, एक हेक्टरमध्ये रताळ्याची लागवड केल्यास त्यातून सुमारे २५ टन उत्पादन मिळू शकते. बाजारात रताळ्याचा भाव १० रुपये किलो किंवा त्याहून अधिक आहे. जर तुम्ही २५ टन रताळे विकले तर तुम्ही २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त कमवू शकता.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३९ : मुघल सम्राट शाहजहान यांनी दिल्ली येथील लाल किल्ल्याचे निर्माण करण्यास पाया रचला.
१८१३ : अमेरिकन वैज्ञानिक जेएफ हम्मेल यांनी रबराचे नमुने सादर केले.
१९३० : ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया देशांतर्गत दूरध्वनी (टेलीफोन) सेवा सुरु करण्यात आली.
१९३३ : 'प्रभात'चा 'सिंहगड' हा चित्रपट प्रदर्शित झाला.
१९३९ : साली स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षामधून आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.
१९४५ : दुसरे महायुद्ध इटलीतील जर्मन सैन्याने दोस्त राष्ट्रांपुढे बिनशर्त शरणागती पत्करली.
१९८६ : लॉस एंजेल्स सेंट्रल लायब्ररीतील आग लागल्यामुळे सुमारे ४,००,००० पुस्तक नष्ट झाले.
१९९१ : बांगलादेशच्या दक्षिण भागातील चितगाव जिल्ह्यात आलेल्या एका भीषण चक्रीवादळाने सुमारे १,३८,००० लोकांचा बळी घेतला तर सुमारे १ कोटि लोक बेघर झाले.
२००७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाने श्रीलंकन क्रिकेट संघाचा पराभव करून तिसऱ्यांदा विश्वकप जिंकला.
२०११ : ब्रिटीश राजकुमार प्रिंस विलियम आणि केट मिडलटन यांचा विवाह पार पडला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४२ : मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रताप यांचे मित्र, सहकारी आणि विश्वासपात्र सल्लागार भामाशाह यांचा जन्मदिन.
१७२७ : फ्रेंच नर्तक आणि बॅलेट चे निर्माते जीन-जॉर्जेस नोव्हर यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑक्टोबर १८१०)
१८४८ : राजा रविवर्मा चित्रकार (मृत्यू: २ आक्टोबर १९०६)
१८६७ : डॉ. शंकर आबाजी भिसे भारताचे 'एडिसन' (मृत्यू: ७ एप्रिल १९३५)
१८९१ : भारतीय कवी आणि कार्यकर्ते भारतीदासन यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९६४)
१९०१ : मिचेनोमिया हिरोहितो दुसर्या महायुद्धाच्या आधी व नंतरच्या काळातील जपानी सम्राट (मृत्यू: ७ जानेवारी १९८९)
१९१९ : साली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात विशेष कौशल्य मिळविणारे प्रख्यात भारतीय तबला वादक अल्ला रखा उर्फ अल्लारख्खा कुरेशी यांचा जन्मदिन.
१९५८ : पद्मभूषण व साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ तसचं, द टेलीग्राफ, हिंदुस्तान टाईम्स आणि हिंदी दैनिक वृत्तपत्र अमर उजाला यांचे स्तंभलेखक रामचंद्र गुहा यांचा जन्मदिन.
१९३६ : झुबिन मेहता भारतीय संगीतकार
१९६६ : फिल टफनेल इंग्लिश फिरकी गोलंदाज
१९७० : आंद्रे आगासी अमेरिकन लॉनटेनिस खेळाडू
१९७९ : प्रसिद्ध भारतीय सेवानिवृत्त क्रिकेटपटू व जलदगती गोलंदाज आशिष नेहरा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२३६ : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे प्रभावी संस्थापक व दिल्लीच्या गादीवर राज्य करणारे पहिले मुस्लीम शासक शम्सउद्दीन इल्तुतमिश यांचे निधन.
१९४५ : हाइनरिक हिमलर जर्मन नाझी अधिकारी (जन्म: ७ आक्टोबर १९००)
१९५८ : भारताच्या उडीसा राज्यातील प्रख्यात स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक व गांधीवादी कार्यकर्ता गोपबंधू चौधरी यांचे निधन.
१९६० : पं. बाळकृष्ण शर्मा ऊर्फ 'नवीन' हिन्दी कवी. हिन्दीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळवण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. (जन्म: ८ डिसेंबर १८९७)
१९७९ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार, लेखक, क्रांतिकारक व समाजसुधारक राजा महेंद्र प्रताप यांचे निधन.
१९८० : श्रीकृष्ण के. क्षीरसागर लेखक, विचारवंत, समीक्षक (जन्म: ६ नोव्हेंबर १९०१)
१९८० : सर अल्फ्रेड हिचकॉक चित्रपट दिग्दर्शक (जन्म: १३ ऑगस्ट १८९९)
१९९७ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सतरावे गव्हर्नर व भारतीय प्रशासकीय सेवेचे सदस्य आर.एन.मल्होत्रा यांचे निधन.
१९९९ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, निर्माता, पटकथा लेखक आणि हिंदी चित्रपटांचे गीतकार केदार शर्मा यांचे निधन.
२००६ : जे. के. गालब्रेथ कॅनेडियन-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (जन्म: १५ आक्टोबर १९०८)
२०१० : गायत्री मंडळाच्या संस्थापिका व सदस्या तसचं, समाजसेविका कमलादेवी शुक्ला यांचे निधन.

# खते, बियाण्यांची टंचाई नको, काळाबाजार रोखण्यासाठी उपाययोजना करा- आ.लंघे

नेवासे। प्रतिनिधी

नेवासे येथे तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन आढावा बैठक आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. आगामी हंगामाच्या तयारीचा आढावा आणि बदलत्या हवामान परिस्थिती, पावसाचे अनिश्चित स्वरूप आणि शेतकऱ्यांसमोरील विविध आव्हाने लक्षात घेता त्यावर नियोजनबद्ध व परिणामकारक तयारीवर विशेष भर देण्यात आला. खते व बियाण्यांचा तुटवडा होऊ नये तसेच काळाबाजार रोखण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात आणि शेतकऱ्यांनीही जागरूक राहावे असे आवाहन यावेळी आ. लंघे यांनी केले.

शेतकऱ्यांनी शेती ओळखपत्र नोंदणीबाबत या बैठकीत सूचना देण्यात आल्या. पीकविमा योजनेची प्रभावी प्रसिद्धी करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मदत वितरित करण्यात आली तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर व अवजारे वाटप आमदार लंघे यांच्या हस्ते करण्यात आले. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यामध्ये कावेरी उमप (कृषी सखी), मोहन तुवर (कृषीभूषण) तसेच नैसर्गिक शेती करणारे गोविंद पाटील यांचा समावेश होता. तालुक्यात ठिबक सिंचन योजनेअंतर्गत १,९९८ शेतकऱ्यांना १५ कोटी रुपये, तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनेसाठी २२.३४ कोटी रुपयांच्या अनुदानाची प्रक्रिया सुरू आहे. खरीप २०२५ मध्ये सोयाबीन पीकविमासाठी १६,१३६ शेतकऱ्यांना २२.६८ कोटी रुपये वितरित झाले आहेत. शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज मिळावे, शेतीसाठी नियमित वीजपुरवठा व्हावा, तसेच पाण्याचे नियोजन मजबूत करावे आणि महाडीबीटी योजनांची अंमलबजावणी अधिक सुलभ व परिणामकारक करावी, यावरही विशेष भर देण्यात आला.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# पाणी, कचरा आणि नोकरभरतीवर स्थायी समितीचे शिक्कामोर्तब

## स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली बैठक

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील अमृतवनाजवळ असलेला कचरा डेपो हलवण्यात यावा, सामनगाव येथील डेपोत कचरा जास्त झाल्याने ती जागा अपुरी पडत आहे. यासाठी नवीन जागेचा प्रस्ताव करावा यासह विविध समस्यांवर चर्चा करण्यासह महानगरपालिका यांच्या स्थायी समितीची बैठक महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी सभागृहात स्थायी समिती सभापती अशोक ऊर्फ लक्ष्मीकांत मनोहर पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. स्थायी समितीची ही तिसरी सभा होती.बैठकीला समिती सदस्य, मनपा उपायुक्त, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये शहरातील कचरा डेपो इतर ठिकाणी हलवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच सामनगाव येथील डेपोमध्ये कचरा वाढल्यामुळे जागा अपुरी पडत असल्याने नवीन जागा निश्चित करण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. शहरातील नागरिकांना दोन दिवसांआड पाणीपुरवठा करण्याबाबत महाराष्ट्र एन्व्हायर्नमेंट इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीसोबत बैठक घेण्याचेही ठरविण्यात आले. तसेच एसटीपी प्रकल्पासंदर्भात संबंधित एजन्सीसोबत चर्चा करण्याचे निर्देश देण्यात आले.

मनपाच्या आर.आर. मंजूर होईपर्यंत आऊटसोर्सिंग तसेच कर्मचारी भरती प्रक्रिया तत्काळ राबवण्याबाबतही प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय पाणीपुरवठा, स्वच्छता, वीज, बांधकाम विभागाची कामे



आणि शिक्षणाशी संबंधित विषयांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी निगडित कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश सभापती व सदस्यांनी प्रशासनाला दिले आहेत. यावेळी नगर सचिव तथा सहायक आयुक्त चव्हाण यांच्यासह कांबळे यांचीही उपस्थिती होती. या बैठकीला महेश निकम, शशिकांत घुगे यांच्यासह इतर स्थायी सदस्य उपस्थित होते.

दरम्यान, उघड्यावर कुणीही मांस विक्री करु नये, बंदिस्त करुन मांस विक्री करावी, याबाबत मनपाकडून कारवाई सुरु करण्यात आली आहे. उघड्यावरील मांस विक्रीमुळे शहरात जागोजागी भटके कुत्रे वाढले आहेत. मांस विक्री बंदिस्त न केल्यास आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे, अशी माहिती स्थायीचे सदस्य तथा नगरसेवक शशिकांत घुगे यांनी दिली आहे. तरुण, तरुणींना मिळेल रोजगार जालना शहरातील महानगर पालिकेत कर्मचारी ९०० पदांची भरती करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे, परंतु त्याला अजून राज्य शासनाकडूनची कारवाई बाकी आहे. तोपर्यंत आऊटसोर्सिंगद्वारे कर्मचारी भरती करुन कामे करुन घेण्याचाही निर्णय घेण्यात आला. यामुळे जालना शहरातील अनेक तरुण, तरुणींना रोजगार मिळण्याला मदत होणार आहे.

नागरी समस्या सोडवण्यावर भर शहरातील नागरी समस्या सोडवण्यावर भर देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने स्थायी समितीकडून नियोजनही केले जात आहे. कचरा, पाणी यासह इतर नागरी समस्या सोडवण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी म्हणून नियोजन केले जात आहे. त्यासाठी टप्प्याटप्प्याने ठराव घेऊन समस्या सोडवण्यावर भर आहे. अशोक पांगारकर, सभापती स्थायी समिती, मनपा जालना.


# अवैध वाळू उपशाविरोधात राष्ट्रवादीचे अर्धनग्न आंदोलन

## शासन नियमांचे उल्लंघन करून नदीपात्रातून रेतीचा उपसा

मंठा । प्रतिनिधी

तालुक्यातील पूर्णा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अवैध रेती उपशाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट मंठा वतीने आंदोलन करण्यात आले. हा प्रकार तात्काळ थांबवावा. दोषींवर कठोर कारवाई करावी. या मागणीसाठी कार्यकर्त्यांनी मंठा तहसील कार्यालयासमोर अर्धनग्न होऊन निषेध नोंदवला.

गेल्या अनेक दिवसांपासून शासन नियमांचे उल्लंघन करून नदीपात्रातून रेतीचा उपसा सुरू आहे. वाहतूकही सुरू आहे. जेसीबी, पोकलेनसारखी यंत्रे वापरून क्षमतेपेक्षा अधिक खोलीपर्यंत उत्खनन होत असल्याचा आरोप करण्यात आला. नदीपात्राची नैसर्गिक रचना धोक्यात येत असल्याचे सांगण्यात आले. पर्यावरणीय हानी वाढत असल्याचा दावाही करण्यात आला. तहसील कार्यालयात दिलेल्या निवेदनात रेती वाहतुकीतील अनियमिततेचा उल्लेख आहे. दोन ब्रासच्या पावतीवर चार ब्रास रेती नेली जात असल्याचा आरोप आहे. चार ब्रासच्या



पावतीवर सहा ब्रास किंवा त्याहून अधिक रेतीची वाहतूक होत असल्याचेही नमूद आहे. एकाच पावतीवर अनेक फेऱ्या टिप्पर, हायवा मारले जात असल्याचा आरोप करण्यात आला. संपूर्ण उत्खनन प्रक्रियेची ईटीएस इलेक्ट्रॉनिक ट्रॅकिंग सिस्टीमद्वारे मोजणी करावी. सखोल चौकशी करावी. अशी मागणी करण्यात आली. ड्रोन कॅमेराद्वारे अचूक मोजमाप होईपर्यंत पूर्णा नदीपात्रातील सर्व प्रकारचे रेती उत्खनन तात्काळ बंद करावे. मागण्या मान्य न झाल्यास पूर्णा नदीपात्रातच उपोषण करण्याचा इशारा विठ्ठल बागल, विनायक बाहेकर, दिगंबर कोळी, आप्पासाहेब चव्हाण, भगवान खंदारे, जगन दवणे आदींनी दिला.

# माकणी-तेरणा पाणीपुरवठा योजना सुरु करण्यासाठी 1 मेपासून उपोषण

## तालुका बैठकीत अर्चना पाटील यांच्यासह उपाध्यक्षांना सुनिता पावशेरेंचे निवेदन

उमरगा । प्रतिनिधी

कलदेव निंबाळा तसेच उमरगालोहारा तालुक्यातील १६ गावांसाठी राबविण्यात येत असलेली माकणी-तेरणा धरणावरील जलजीवन पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली असूनही अद्याप सुरू करण्यात आलेली नाही. ही योजना तातडीने सुरू करावी, या मागणीसाठी ग्रामपंचायत गटनेत्या तथा राष्ट्रवादी महिला जिल्हा उपाध्यक्षा सुनिता देविदास पावशेरे यांनी १ मे महाराष्ट्र दिनापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

भूकंपानंतरच्या काळातील २२ खेडी पाणीपुरवठा योजनेची महावितरणकडे ७६ लाख रुपयांची वीज बिल थकबाकी असल्याचे कारण देत योजना सुरू करण्यात येत नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. ही थकबाकी शासनाने किंवा जिल्हा परिषदेने भरावी अथवा माफ करावी आणि योजना त्वरित सुरू करावी, अशी मागणी पावशेरे यांनी केली आहे. यापूर्वी त्यांनी उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, आमदार, जिल्हा परिषद पदाधिकारी, विभागीय आयुक्त,



जिल्हाधिकारी, सीईओ तसेच जीवन प्राधिकरण अभियंता यांना निवेदने देऊन पाठपुरावा केला आहे. मात्र अद्याप ठोस निर्णय न झाल्याने आंदोलनाचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सध्या या गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई असून महिला, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे गावांमध्ये संतापाची भावना असून पाणीपुरवठा तातडीने सुरू करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडूनही होत आहे. थकबाकीचा प्रश्न सोडवा उमरगालोहारा तालुक्यातील १६ गावांना माकणी-तेरणा धरणावर आधारित जलजीवन पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली असूनही वीज बिल थकबाकीमुळे ती सुरू करण्यात आलेली नाही. ७६ लाख रुपयांच्या थकबाकीचा मुद्दा पुढे करत प्रशासनाने अडथळा निर्माण केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. योजनेचा लाभ न मिळाल्याने गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून महिलांना दूरवरून पाणी आणावे लागत आहे. त्यामुळे सुनिता पावशेरे यांनी १ मेपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा दिला आहे. शासनाने थकबाकीचा प्रश्न सोडवून योजना तत्काळ सुरू करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# शेतकऱ्यांना चारा बियाणांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

जालना । प्रतिनिधी

सन २०२६-२०२७ या वर्षामध्ये संभाव्य चारा टंचाई टाळण्यासाठी चारा उत्पादन कार्यक्रम अंतर्गत चारा बियाणे वाटप करण्यात येणार आहे. ज्या लाभधारकांकडे सिंचनाची सोय आहे, व ज्यांच्याकडे पशुधन आहेत अशा लाभधारकांना १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे वितरीत करण्यात येणार आहे. संभाव्य एल-निनो या हवामान घटकांचा प्रतिकुल परीणाम होण्याची शक्यता असलयाने चारा टंचाई टाळण्यासाठी चारा बियाणांसाठी इच्छूकांनी अर्ज करावेत. तसेच संभाव्य चारा टंचाई निर्माण होवु नये, व चारा छावण्याची वेळ पडू नये याकरीता आतापासुनच चारा निर्मीती व त्याच्या साठवणुकीबाबतचे अचुक नियोजन करणे आवश्यक आहे. ज्या लाभार्थ्याकडे भारत पशुधन प्रणाली किंवा केंद्र सरकारने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या प्रणालीवर नोंद असलेली स्वत: ची किमान ३ ते ४ जनावरे आहेत, अशा लाभधारकांना प्राधान्य देण्यात येईल. एका आर्थीक वर्षात एका लाभधारकांस एकदाच लाभ अनुज्ञेय राहणार आहे. तरी इच्छूक शेतकऱ्यांनी दि. ०५ मे, २०२६ पर्यत आपले अर्ज संबधीत आपल्या गावातील पशुवैद्यकिय संस्थेकडे सादर करावीत, असे आवाहन करण्यात आली आहे

# पाणीटंचाई व घरकुल आढावा बैठकीस गैरहजर राहणे भोवले

## तीन ग्रामसेवक तडकाफडकी निलंबित, सीईओ विवेक गायकवाड यांचे आदेश

मुंबई । प्रतिनिधी

हिंगोली पंचायत समितीमध्ये आयोजित पाणीटंचाई आढावा बैठक व घरकुल योजनेच्या बैठकीस गैरहजर राहणाऱ्या तीन ग्रामसेवकांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले असून त्यांच्या निलंबनाचे आदेश बुधवारी तारीख २९ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी काढले आहे. या कारवाईमुळे ग्रामसेवक संघटनेत एकच खळबळ उडाली आहे. हिंगोली जिल्ह्यात सध्या पाणी प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. या पाणी प्रश्न संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी पंचायत समिती मधून आढावा बैठक घेऊन पाणी टंचाईची माहिती घेण्यास सुरुवात केली आहे. याशिवाय घरकुल योजनेच्या कामाला गती देण्यासाठी ग्रामसेवकांची बैठक बोलावली जात आहे. या बैठकीत गावनिहाय आढावा घेऊन पाणीटंचाईवर काय उपाययोजना करता येईल याबाबत






आवश्यक त्या सूचना दिल्या जात आहेत.

दरम्यान हिंगोली पंचायत समिती कार्यालयामध्ये मंगळवारी ता २८ बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्यासह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड, गटविकास अधिकारी माया वानखेडे यांच्यासह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी गायकवाड यांनी हिंगोली तालुक्यातील गावनिहाय पाणीटंचाईचा आढावा घेतला तसेच त्या ठिकाणी पाण्यासाठी काय पर्यायी उपाययोजना केल्या जातील याची माहिती घेऊन त्याबाबतच्या सूचना दिल्या. याशिवाय घरकुल योजनेची कामे संथ गतीने का सुरू आहेत त्याबाबत काय अडचणी आहेत याची माहिती घेऊन त्या अडचणी सोडवण्याबाबत आवश्यक त्या सूचनाही दिल्या. दरम्यान या बैठकीस हिंगोली तालुक्यातील सर्व ग्रामसेवक उपस्थित राहणे आवश्यक होते. मात्र ग्रामसेवक एल. एम. केंद्रे, डी. आर राठोड, आर.एस. नागरगोजे हे गैरहजर होते. याशिवाय तीन ग्रामसेवक बैठकीसाठी एक तास उशिराने हजर झाले होते. हिंगोली तालुक्यातील पाणीटंचाईच्या महत्त्वाच्या प्रश्नावर दुर्लक्ष केल्याच्या कारणावरून ग्रामसेवक केंद्रे, राठोड, नागरगोजे यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्या निलंबनाचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी बुधवारी ता २९ काढले आहे. याशिवाय उशिराने येणाऱ्या तीन ग्रामसेवकांच्या एक वेतनवाढ बंद करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. या कारवाईमुळे ग्रामसेवक संघटनेतून खळबळ उडाली आहे.

# गोवंश संरक्षण गोहत्या बंदीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



जालना । प्रतिनिधी

येथील अभिलाषा चॅरिटी ट्रस्टच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन गोवंश संरक्षण व गौहत्या बंदीसाठी निवेदन देण्यात आले. मोकाट जनावरांच्या वाढत्या समस्येमुळे शहर व ग्रामीण भागात निर्माण झालेल्या अडचणींकडे यावेळी प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. याप्रसंगी बोलताना ट्रस्टच्या अध्यक्षांनी सांगितले की, गौमाता ही आपल्या संस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र, सध्या मोकाट जनावरे प्लास्टिक खाऊन आजारी पडत आहेत.

पाण्याअभावी त्रस्त होत आहेत आणि अपघातात बळी जात आहेत. ही स्थिती अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.निवेदनात एकुण ६ मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

त्यामध्ये जालना जिल्ह्यात गोहत्येवर पूर्ण बंदी आणावी, प्रत्येक तालुक्यात शासकीय गौशाळा उभाराव्यात, जखमी जनावरांसाठी पशु रुग्णवाहिका सेवा सुरु करावी, या मागण्यांचा समावेश आहे. तसेच गो तस्करीवर कडक कारवाई करावी, निवेदन देताना गोविंद जामदार, संतोष भुमरे हे होते.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय**
**ता. अंबड जि. जालना**
E-Mail ID :- tahsildarambad@gmail.com
दूरध्वनी क्रमांकः/०२४८३-२२००२६
जा.क्र.२०२६/जमा-२/कावी-६०३
दिनांक-२८/०४/२०२६

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस कळविण्यात येते कि मौजे हसनापुर ता. अंबड जि. जालना यांना जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे हसनापुर येथील गट क्र.८२ मधील २ हे ०२ आर संपादित जमीनीच्या ७/१२ उता-यावर खाजगी व्यक्ती नामे संतोष जानकिराम मिरकड रा. हसनापुर ता.अंबड यांनी खाजगी व्यक्तीचे नावे कमी करून महाराष्ट्र शासन अशी नोंद घेण्याची विनंती केलेली आहे. अर्जासोबत त्यांनी संपादित क्षेत्राचे अवार्ड (ई-स्टेटमेंट), जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचा दि.१९.१२.२०२२. चा आदेश एकत्रिकरण नक्कल व महाराष्ट्र शासनाचा फेरफार क्र.२४०६ इ. कादगपत्रे जोडली आहेत.

सबब प्रकरणात कोणाचाही आक्षेप असेल तर लेखी आक्षेप अर्जासह या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रशीध्दी झाल्याच्या दिनांका पासून ७ दिवसाच्या आत सादर करावे.

स्वाक्षरित
**तहसिलदार अंबड**

# जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन कारवाई करा

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक;अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांचे आदेश

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यातील काही भागांत अनधिकृत वैद्यकीय व्यावसायिक (बोगस डॉक्टर) असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील औषध दुकाने तपासावीत. बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन कारवाई करावी. अन्न व औषध प्रशासनाने भेसळयुक्त खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करावी, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी अधिकाऱ्यांना दिले. ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक अपर



जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झाली. बैठकीस वैधमापनचे आर.डी. दराडे, महावितरणचे समाधान म्हस्के, एस.बी. मठपती, बीएसएनएलचे पी.एस. इंगळे, अन्न व औषध विभागाच्या अश्विनी तांबे, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नारायण पवार, उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे राजकुमार मुंडे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी एन. एस. दिवटे आदी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील आठवडी बाजारात काही विक्रेते दगडाचे माप वापरतात. अशा विक्रेत्यांची तपासणी करून वैधमापन विभागाने कारवाई करावी. तसेच वेळोवेळी टॅक्स भरूनही जालना मार्केट कमिटी परिसरातील स्वच्छता होत नाही. मार्केट यार्डमध्ये स्वच्छता नियमित करावी. महावितरणने स्मार्ट मीटरसंबंधी प्राप्त तक्रारींचे निवारण करावे. नागरिकांना स्मार्ट मीटरबद्दल सविस्तर माहिती द्यावी. ग्राहकांनी महावितरणसंबंधी तक्रारी १९१२ आणि १८००२१३४३५ या क्रमांकांवर नोंदवाव्यात. बैठकीत अशासकीय सदस्यांनी मांडलेल्या तक्रारींची दखल घेऊन योग्य कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अहवाल सादर करण्याचे निर्देश मिसाळ यांनी दिले. प्रारंभी सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी दिवटे यांनी प्रास्ताविकात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे उद्दिष्ट सांगितले. मागील बैठकीतील कार्यवाहीची माहिती दिली. .. या संकेतस्थळावर ग्राहकांच्या समस्यांसाठी पोर्टल उपलब्ध आहे. ग्राहकांच्या हिताशी तक्रारी असल्यास त्या ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने सादर करण्याचे आवाहन केले. पोर्टलच्या माध्यमातून समस्या सादर कराव्यात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आहे. ग्राहकांच्या तक्रारी त्वरित सोडविणे आहे. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेने ग्रामीण भागात विविध माध्यमांतून ग्राहक जनजागृती करावी. ग्राहकांना काही अडचणी असल्यास जिल्ह्याचे संकेतस्थळ तक्रारीसाठी पोर्टल उपलब्ध करून दिले. नागरिकांनी समस्या या पोर्टलच्या माध्यमातून सादर कराव्यात, असे अपर जिल्हाधिकारी मिसाळ यांनी सांगितले.

# अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर मोठमोठ्या भेगा

## कंत्राटदारांचा डांबराने ठिगळं लावण्याचा केविलवाणा प्रयत्न! -डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या अहमदपूरअहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डीची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असुन ठिकठिकाणी पडलेल्या भेगा, तडे आणि खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. सुमारे १७० किलोमीटर लांबीच्या आणि ८७८ कोटी रुपये खर्चाच्या या महामार्गावर मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान विशेषतः रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. दुचाकी वाहनांचे चाक खड्ड्यांमध्ये अडकून अपघात होत असल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या संदर्भात तक्रारी करूनही ठोस उपाययोजना न करता संबंधित कंत्राटदार एचसीपीएल कडून केवळ डांबर टाकून खड्डे बुजवण्याचा तात्पुरता केविलवाणा



प्रयत्न केला जात आहे. ही मलमपट्टी तात्पुरती स्वरूपाची दुरुस्ती असल्याने समस्या कायमच राहार आहे. दरम्यान, मांजरसुंभा ते अंबेजोगाई दरम्यान एचपीएम कंपनीकडील कामही रखडलेल्या अवस्थेत आहे. दुभाजक, पथदिवे, दिशादर्शक फलक आणि रस्त्यालगतच्या नाल्यांचे काम अपूर्ण असल्याने स्थानिक नागरिक व दुकानदारांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वारंवार लेखी तक्रारी पान ३ वर

# अंबादास दानवे यांना उमेदवारी जाहीर होताच बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जल्लोष

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विधानपरिषदेतील रिक्त झालेल्या ९जागेवर येत्या १२ मे रोजी मतदान होणार आहे यामध्ये विधानसभा सदस्यांच्या संख्येनुसार महाविकास आघाडीचा एक आमदार होणार आहे , आज महाविकास आघाडीच्या वतीने विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे दादा यांची उमेदवारी आज जाहीर करताच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा पक्षाच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत आनंदोत्सव साजरा करण्यात



आला,जय भवानी, जय शिवाजी, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धव ठाकरे साहेब झिंदाबाद अशा गगनभेदी घोषणा देऊन फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी सांगितले की , अंबादास दानवे दादा यांच्या निष्ठेला फळ मिळाले असुन उद्धव साहेबांनचा हा निर्णय योग्य असुन मी जिल्हा शिवसेनेच्या वतीने स्वागत करतो यावेळी जेष्ठ शिवसैनिक व तालुका सचिव नंदुभाऊ येवले, तालुका सहसचिव संदिप भानप, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अशपाक शेख , माजी सरपंच आयुबभाई पठाण ,महेश जाधव, बाबु कुटे , बाबुराव पटेकर, गणेश कुटे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# मुस्लिमांच्या विकास योजनांवर सुनेत्राताई पवार कटिबद्ध

## मुलींचे वसती गृह व मार्टीसाठी ठाम भूमिका – शेख निजाम

बीड । प्रतिनिधी

अल्पसंख्याक विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आज आयोजित करण्यात आलेली बैठक सकारात्मक आणि परिणामकारक चर्चेसह यशस्वीरीत्या संपन्न झाली.

यावेळी शिक्षण, कौशल्य विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यास राज्य सरकार



कटिबद्ध असल्याची ग्वाही देत, चेंबूर येथील अणुशक्तीनगर परिसरात व बीड येथील अल्पसंख्याक मुलींसाठीच्या प्रस्तावित मुलीचे वसतिगृह व जागा उपलब्ध करून कामाला गती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले मा.आमदार विजयसिंह पंडित, नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, शेख मुजीबभाई,फारुख पटेल, भागवत तावरे यांच्या सतत पाठपुरावा चालु आहे. अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी राज्य सरकार विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत असून या प्रयत्नांना अधिक गती देण्यात येणार आहे. विशेषतः मुलींच्या उच्च तांत्रिक शिक्षणासाठी दर्जेदार सुविधा निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित केले.

या बैठकीत 'मार्टी' संस्थेशी संबंधित विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संस्थेसाठी स्वतंत्र लेखा उघडणे, कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी मंजूर पदे तत्काळ भरणे तसेच तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्त्वावर कार्यालय सुरू पान ३ वर

# मोबाईल शॉपी फोडणारा आंतरराज्यीय अट्टल गुन्हेगार जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी; ५० हून अधिक गुन्हे असलेला आरोपी गजाआड

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सुभाष रोडवरील श्री साई मोबाईल शॉपी फोडून मोबाईल लांबवणाऱ्या आंतरराज्यीय अट्टल गुन्हेगाराला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. रामनिवास मंजु गुप्ता (वय ३७, रा. कल्याण, जि. ठाणे) असे या आरोपीचे नाव असून, त्याच्यावर महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात ५० पेक्षा जास्त गुन्हे दाखल असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास सुभाष



रोडवरील श्री साई मोबाईल शॉपीचे सेंटर लॉक आणि शटरचे कोंडे तोडून अज्ञात चोरट्याने दुकानात प्रवेश केला होता. या ठिकाणाहून विविध कंपन्यांचे महागडे मोबाईल चोरून नेण्यात आले होते. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (ए), ३३१ (४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासाची चक्रे फिरली

या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता. घटनास्थळावरील सीसीटीव्ही पान ३ वर

# परळीत कपड्याच्या मॉलला भीषण आग

परळी । प्रतिनिधी

शहरातील अत्यंत गजबजलेल्या राणी लक्ष्मीबाई टावर परिसरातील रेझिंग या कपड्याच्या मॉलला आज दुपारी अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली असून यात लाखोंचे नुकसान झाले आहे. परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टावर परिसरातील रेझिंग या कपड्याच्या मॉलला बुधवारी (दि. २९) रोजी दुपारी भीषण आग लागली. आगीत आतील मालाचे प्रचंड नुकसान झाले आहे. मात्र, ही आग विझवण्यासाठी नगरपालिकेची अग्निशामक दलाची गाडी तब्बल ४० ते ५० मिनिटे उशिरा पोहोचल्याने स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. आग लागल्यानंतर तब्बल ५० मिनिटे उलटून गेल्यावर घटनास्थळी अग्निशामक दलाची गाडी पोहोचली, मात्र धक्कादायक बाब म्हणजे ही गाडी नगरपरिषदेची नसून थर्मल पॉवर स्टेशनची होती. शहरात स्वतःची यंत्रणा उपलब्ध असतानाही ती वेळेत न पोहोचणे, हे गंभीर निष्काळजीपणाचे द्योतक ठरत आहे.




# परळी तालुक्यातील तीनही ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत आ. धनंजय मुंडेंचे एकहाती वर्चस्व!

## सिरसाळा पुन्हा ताब्यात, तर जळगव्हाण आणि मरळवाडी सहज राखली; सर्व नवनिर्वाचित सरपंच जगमित्र कार्यालयात दाखल

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीचे निकाल स्पष्ट झाले असून परळी तालुक्यातील तीनही ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या उमेदवारांनी एकहाती विजय मिळवत तीनही ग्रामपंचायती वरती धनंजय मुंडे यांचे एकेरी वर्चस्व सिद्ध केले आहे.

या पोटनिवडणुकीत परळी तालुक्यातील सिरसाळा या मोठ्या व मानाच्या समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत शेख नसीब यांनी मोठ्या फरकाने विजय मिळवला असून विजयानंतर त्यांनी




सहकाऱ्यांच्या समवेत आ. धनंजय मुंडे यांच्या जगमित्र कार्यालयात जाऊन स्व. पंडित अण्णा मुंडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जल्लोष केला. यावेळी सिरसाळा ग्रामपंचायत नवनिर्वाचित सरपंच शेख नसीब शेख रहीम, माजी सरपंच फिरोज पठाण, ग्रामपंचायत सदस्य शेख नय्युम, शेख रफिक, अक्रम पठाण, सलमान पठाण, माजी सरपंच इम्रान पठाण, उपसरपंच सुलतान पठाण, मोहम्मद इनामदार, गुड्डू पठाण, मुस्लिम संघाचे जिल्हाध्यक्ष शिराज देशमुख, सिरसाळा सेवा सहकारी सोसायटी चेअरमन नदीम भाई, जावेद पत्रकार, अशोक गलांडे, तंटामुक्त अध्यक्ष गाव समिती सिरसाळा अयोसोद्दीन इनामदार, विद्यार्थी आघाडी बीड जिल्हा अध्यक्ष शेख राजू, इरफान बॉस, रफिक बागवान आदी उपस्थित होते. त्याचबरोबर जळगव्हाण येथील नवनिर्वाचित सरपंच संदीप वसंतराव चव्हाण यांसह राजाभाऊ सपकाळ, सुभाष जाधव, अमोल जाधव, उद्धवराव जाधव, कैलास क्षीरसागर, प्रल्हाद पंडित, शिवाजी राठोड, लक्ष्मण चव्हाण, प्रकाश चव्हाण, रामजी चव्हाण, लक्ष्मण राठोड, विश्वनाथ आडे, उद्धव सोळंके यांसह आदी उपस्थित होते. मरळवाडी चे मयत सरपंच बापू आंधळे यांच्या पत्नी व नवनिर्वाचित सरपंच श्रीमती दीपाली बापुराव आंधळे यांच्या सह उपसरपंच वाल्मीक आघाव, चेअरमन हनुमान आंधळे, त्र्यंबक फड, विष्णू आंधळे, बाळासाहेब फड, संतराम आंधळे, परमेश्वर फड, बापुराव फड, अश्रूबा आघाव, तुकाराम व्हावळे, शिवाजी फड यांसह पदाधिकारी आदींनी जगमित्र कार्यालयात उपस्थित राहून विजयाचा जल्लोष साजरा केला.

# महिला आरक्षण विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेसविरोधात शिवसेनेचे धरणे निषेध आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

लोकसभेत महिला आरक्षण विधेयकाला काँग्रेस पक्षाने विरोध केल्याच्या निषेधार्थ बीड जिल्ह्यातील माजलगाव तहसील कार्यालयासमोर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्या वतीने शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांच्या नेतृत्वाखाली दि.२९ एप्रिल बुधवार रोजी दुपारी जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने आंदोलन करण्यात आले. आंदोलनाद्वारे काँग्रेस पक्षाच्या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध




करण्यात आला.

दि. १७ एप्रिल २०२६ रोजी लोकसभेत महिला आरक्षण विधेयकावर मतदान झाले होते. यावेळी काँग्रेस पक्षाने विधेयकाच्या विरोधात मतदान केल्याचा आरोप करत, त्यामुळे महिला सक्षमीकरणाला धक्का बसल्याचे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले. महिला आरक्षण विधेयक नामंजूर होणे म्हणजे देशातील महिलांच्या हक्कांवर अन्याय असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन,संपर्क प्रमुख मनोज शिंदे तसेच जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात पान ३ वर

# काडीवडगाव ग्रा.पं.पोट निवडणुकीत भगीरथी राऊत विजयी

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव ग्रामपंचायत च्या पोट निवडणुकीमध्ये सौ भगीरथी अत्तम राऊत यांनी सौ शामल सुधाकर हातागळे यांचा १२५ मतानी पराभव करत दणदणीत विजय मिळवला असून ग्रामस्थांनी या विजय उत्सवात गुलालाची उधळण फटाक्यांची आतिषबाजी तोफांची सलामी देत आनंदोत्सव साजरा केला.

तालुक्यातील बहुचर्चित असलेली काडीवडगाव ग्रामपंचायत ची पोट निवडणूक ही एकदम चुरशीची आणि प्रतिष्ठेची बनली होती. लागलेल्या संपूर्ण तालुक्याचे या ग्रामपंचायत निकालाकडे लक्ष लागले होते.तालुक्यात प्रथमच सर्व ग्रामस्थांच्या वतीने सरपंचावर



अविश्वास ठराव पारित करण्यात आला होता.त्यामुळे प्रशासनाच्या वतीने या रिक्त पदासाठी निवडणूक घेण्यात आली होती.मंगळवार दि २८ रोजी झालेल्या निवडणुकीचा निकाल बुधवार दि २९ रोजी याचा नुकताच निकाल जाहीर झाला.

यामध्ये सरपंच पदासाठी सौ भागीरथी अत्तम राऊत यांना ५४५ तर प्रतिस्पर्धी सौ शामल सुधाकर हातागळे यांना ४२० मते मिळाली यामध्ये भगीरथी राऊत यांचा १२५ मताने दणदणीत विजय झाला आहे.तहसिलदार वैभव महेंद्रकर व ना तहसिलदार विवेक उढाण यांच्या मार्गदर्शनाखाली रफीक शेख सर यांच्या नियोजना खाली निवडणुक निर्णय अधिकारी अनिल नरसाळे,साह्यक निवडणुक अधिकारी म्हणुन कुलेवाड यांनी काम पाहीले,

काम करत आलोय काम करत राहु

आमचा विजय हा काळया दगडावरील पांढरी रेघ होती.आ प्रकाश दादा सोळंके व सभापती जयसिंह भैया सोळंके यांच्या माध्यमातून गावचा विकास चालू आहे त्याला खंड न पडण्यासाठी ग्रामस्थांना आम्ही आश्वासित केले होते. ग्रामस्थांनी आमच्यावर टाकलेला विश्वासाला कदापिही तडा जाऊ दिला जाणार नाही.काम करत आलोय काम करतच राहु.

-गोविंद बादाडे (ऊ सरपंच काडीवडगाव)

# पांढरी येथे शेतातील सौर कृषी पंपाची चोरी

## आष्टी परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी परिसरासह तालुक्यातही मोठ्या प्रमाणावर शेतातील पंपाच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून अनेक ठिकाणी मोटारी व मोटारीच्या वायर्स चोरीच्या घटना घडत आहेत याकडे पोलीस प्रशासनाने तात्काळ उपयोजना कराव्यात अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

तालुक्यातील पांढरी येथे शेतातील सौर कृषी पंप चोरीस गेल्याची घटना समोर आली आहे. याबाबत संतोष बबन शेळके (वय ४२, रा. पांढरी ता. आष्टी जि. बीड) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,



शेळके यांच्या मालकीची मौजे पांढरी येथील सर्वे नंबर ६१६ मध्ये २ हेक्टर २१ आर जमीन असून, त्या ठिकाणी शासनाच्या "मागेल त्याला सौर कृषी पंप" योजनेअंतर्गत सौर पंप बसविण्यात आला होता. यासाठी त्यांनी सुमारे ४४ हजार ९२९ रुपये भरले होते.महाराष्ट्र शासनाने ९० सबसिडी मध्ये एकूण किंमत रु ३ लक्ष ८६ हजार ३८७ रुपये एवढ्या किंमतीचा पूर्ण सेट होता. महावितरणमार्फत पान ३ वर

# विद्यार्थ्यांनो ज्ञानसाधना करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रगत समाजाचे स्वप्न साकार करा -डॉ. इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाशिवाय प्रगती शक्य नाही. समाजातील अनेक युवक अजूनही शिक्षणात मागे असल्याची खंत व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी वर्षातील ३६४ दिवस शिक्षणासाठी देवून ज्ञानसाधना करावी, आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रगत समाजाचे स्वप्न साकार करावे असे आवाहन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

तालुक्यातील आपेगाव येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमावेळी ते बोलत होते. आपेगाव येथे सकाळपासूनच



गावात जयंतीचा उत्साह पाहायला मिळत होता. कार्यक्रमाची सुरूवात डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सरपंच प्रशांत सरवदे, प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध व्याख्याते मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, पंचायत समितीचे माजी उपसभापती तानाजी देशमुख, जयजित शिंदे, निलेश शिंदे, राजपाल काकडे, लक्ष्मण आचार्य, बळीराजे वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ.राजेश इंगोले यांनी विद्यार्थ्यांना स्वतः मध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, शिक्षण हे केवळ नौकरीसाठी नसून व्यक्तिमत्त्व विकासासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ.बाबासाहेबांनी आयुष्यभर शिक्षणाच्या जोरावरच, बुद्धिमत्तेचा वापर करून अन्यायाविरूद्ध लढा दिला आणि समाजाला नवी दिशा दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईल, मनोरंजन यापेक्षा अभ्यासाला अधिक वेळ देऊन स्वतःचे भविष्य घडवावे, एक दिवस जयंती दिनी भीम अनुयायी नाचूनच जयंती साजरी करतील पण इतर ३६४ दिवस वाचून साजरी करतील. शिक्षण घेऊन, ध्येय समोर ठेवून विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली शासनकर्ती जमात बनण्यासाठी प्रयत्न करावा. पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामतीत सुनेत्रा पवारांचा 'विराट' विजय निश्चित! ९७ टक्के मते मिळणार, रिंगसाईड रिसर्चचा एक्झिट पोलचा अहवाल

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याच्या राजकीय पटलावर अत्यंत संवेदनशील ठरलेल्या बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल नेमका काय लागणार, याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राहुरीचे ज्येष्ठ नेते दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या दोन्ही जागांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडली.





या पार्श्वभूमीवर, 'रिंगसाईड रिसर्च' या संस्थेने जाहीर केलेल्या एक्झिट पोलने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. या अंदाजानुसार, दोन्ही ठिकाणी महायुतीच्या उमेदवारांनी एकतर्फी वर्चस्व गाजवले असून, बारामतीमध्ये सुनेत्रा पवार ऐतिहासिक मताधिक्याचा नवा विक्रम प्रस्थापित करण्याची शक्यता आहे. बारामतीमध्ये सुनेत्रा पवार यांच्या रूपाने महायुतीने आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती. सत्ताधारी पक्षाने ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न केले होते, मात्र लोकशाहीच्या रिंगणात ही लढत अटळ ठरली. 'रिंगसाईड रिसर्च'च्या आकडेवारीनुसार, बारामतीकरांनी सुनेत्रा पवार यांना अक्षरशः डोक्यावर घेतले असून त्यांना ९२ ते ९७ टक्के इतके अभूतपूर्व मतदान मिळण्याचा अंदाज आहे.

जर हा अंदाज प्रत्यक्ष निकालात उतरला, तर महाराष्ट्राच्या संसदीय इतिहासातील हे आजवरचे सर्वात मोठे रेकॉर्डब्रेक मताधिक्य ठरेल. इतर उमेदवार आणि 'नोटा'च्या पारड्यात केवळ ३ ते ८ टक्के मते जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, सुनेत्रा पवार यांनी बारामतीचा बालेकिल्ला केवळ राखलाच नाही तर तो अधिक मजबूत केल्याचे चित्र दिसत आहे. दुसरीकडे, राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीतही महायुतीचाच 'गजर' पाहायला मिळत आहे. भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी आपल्या वडिलांचा राजकीय वारसा समर्थपणे पुढे नेल्याचे एक्झिट पोलच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. अक्षय कर्डिले यांना ७८ ते ८३ टक्के मतदारांनी कौल दिला असून त्यांनी विजयाचे मोठे अंतर निश्चित केले आहे. त्यांच्या विरोधात असलेले राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांना अवघी ७ ते ९ टक्के मते मिळताना दिसत आहेत. याशिवाय, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके यांना ३ ते ५ टक्के, तर अपक्ष उमेदवार रावसाहेब खेवरे यांना ४ ते ६ टक्के मते मिळण्याचा अंदाज आहे.

# पुणे विद्यापीठ प्राध्यापक भरतीत एटीआर भरण्यास मुदतवाढ

**पुणे । प्रतिनिधी**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांच्या १११ जागांच्या भरती प्रक्रियेत ऑनलाइन अर्जात शैक्षणिक, संशोधन, अध्यापन (एटीआर) तपशील न भरलेल्या उमेदवारांना विद्यापीठाने आणखी एक संधी दिली आहे. त्यानुसार संबंधित उमेदवारांना एटीआर भरण्यासाठी ५ मेपर्यंत संधी दिली असून, यामुळे उमेदवारांना त्यांची अपात्रता टाळता येणार आहे. तशा प्रकारचे परिपत्रक विद्यापीठाने प्रसिद्ध केले आहे.

विद्यापीठातील प्राध्यापक भरती प्रक्रियेसाठी नऊ हजार उमेदवारांनी अर्ज केला आहे. मात्र, अनेक उमेदवारांनी एटीआर तपशील भरला नसल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, संबंधित उमेदवार भरती प्रक्रियेत अपात्र ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही बाब लक्षात घेऊन एटीआर न भरलेल्या उमेदवारांना संधी देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. मात्र, वाढीव मुदतीमध्ये उमेदवारांना नव्याने अर्ज करता येणार नाही. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांमधील शासनमान्य प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त एकूण १११ शिक्षकीय पदांच्या भरतीकरिता जाहिरात १३ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रसिद्ध केली होती.

तसेच, त्याबाबत वेळोवेळी शुद्धिपत्रक प्रसिद्ध केले होते. या जाहिरातीनुसार सर्व उमेदवारांनी शैक्षणिक संशोधन तपशील (यापूर्वीचा एटीआर ६० गुण) आणि लागू असल्यास किमान १२०/ ७५ गुणांचा रिसर्च स्कोअर (एपीआय) संबंधित आवश्यक त्या कागदपत्रांसह जमा करणे अनिवार्य आहे. मात्र, अनेक उमेदवारांनी याची पूर्तता केली नसल्याने त्यांची उमेदवारी रद्द होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उमेदवारांनी ऑनलाइन पद्धतीने त्यांच्या अर्जामध्ये ५ मेपर्यंत बदल करावेत. अर्जात बदल, सुधारणा केलेल्या उमेदवारांनी अर्जाची सुधारित प्रत, एटीआर, संबंधित आवश्यक त्या कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयातील प्रशासन शिक्षक कक्षाकडे ९ मेपर्यंत सादर करणे आवश्यक असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

# ठेकेदाराचा निष्काळजीपणा, पुणेकर त्रस्त; त्रिमूर्ती चौकात ड्रेनेज कामानंतर रस्ता खचला

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील भारती विद्यापीठ परिसरातील त्रिमूर्ती चौकात ड्रेनेज कामानंतर रस्ता योग्यरीत्या न दुरुस्त केल्याने गेल्या दोन-तीन दिवसांपासून प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. सोमवारी खडी वाहतूक करणारा टेम्पो खड्ड्यात अडकल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली होती. नागरिकांमध्ये ठेकेदार व प्रशासनाविरोधात संतापाची लाट उसळली आहे. शहरातील रस्ते कामांमधील निष्काळजीपणाचा आणखी एक प्रकार भारती विद्यापीठ परिसरात समोर आला आहे. त्रिमूर्ती चौकात ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर खड्डा तात्पुरत्या स्वरूपात माती टाकून बुजवण्यात आला. मात्र ही माती व्यवस्थित दाबली न गेल्याने रस्ता धोकादायक बनला आहे. यातच सोमवारी सकाळी खडी वाहतूक करणाऱ्या टेम्पोचे चाक खड्ड्यात अडकले. रस्त्याच्या मध्यभागी वाहन अडकल्याने चौकातील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली.



कामावर जाणारे नागरिक, विद्यार्थी आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त करत ठेकेदार व प्रशासनावर निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता व्यवस्थित न केल्यामुळे अशा घटना वारंवार घडत आहेत, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली. वाहतूक कोंडी नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांना गर्दीच्या वेळेत तीन ते चार वॉर्डन तैनात करावे लागत आहेत. तरीही भर चौकात वाहनचालकांमध्ये वादावादीचे प्रसंग घडत आहेत. वाहतूक पोलिसांनी संबंधित ठेकेदाराला रात्रीच्या वेळेत काम करण्याची परवानगी दिली होती. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता पूर्ववत डांबरी करण्याचे लेखी आश्वासनही घेतले होते. काही लोकप्रतिनिधी या परवानगी प्रक्रियेत सक्रिय होते; मात्र सध्याच्या समस्येकडे ते दुर्लक्ष करत असल्याची टीका होत आहे. दरम्यान, धनकवडी क्षेत्रीय कार्यालयाच्या सहायक आयुक्त सुरेखा भणगे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला, मात्र संपर्क होऊ शकला नाही.

# वृद्धेला घरात घुसून लुटले, सीसीटीव्ही मध्ये कैद झाला चकवा द्यायला कपडेही बदलले; शेवटी पोलिसांनी पकडलेच

**नारायणगाव । प्रतिनिधी**

सावरगाव (ता. जुन्नर) येथे आठ दिवसापूर्वी दुपारच्या वेळी एका वयोवृद्ध महिलेच्या घरात घुसून मारहाण करत सोन्याचे मंगळसूत्र हिसकावणाऱ्या चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बेड्या ठोकल्याची माहिती पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर व किरण अवचर यांनी दिली. जुन्नर पोलीस स्टेशन हद्दीत दि. २२ एप्रिल रोजी ही घटना घडली होती. फिर्यादी कल्पना बाजीराव राजगुरू (वय ६२, रा. सावरगाव, ता. जुन्नर, जि. पुणे) या दुपारच्या वेळी घरी एकट्या असताना एका अज्ञात चोरट्याने




त्यांच्या घरात घुसून त्यांच्यावर हल्ला केला. आरोपीने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेले. तसेच त्यांना जबर मारहाण करून तोंडात दगड कोंबून चार दात पाडल्याची धक्कादायक घटना घडली होती.

या प्रकरणी जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी आरोपीला तात्काळ अटक करण्याच्या सूचना दिल्या होत्या. स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास करत घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये एक संशयित मोटारसायकलवरून जाताना दिसून आला. पुढे नारायणगावच्या दिशेने गेल्यानंतर आरोपीने पोलिसांना चकवा देण्यासाठी कपडे बदलले व वारंवार मार्ग बदलला. तरीही गुन्हे शाखेच्या पथकाने त्याचा मागोवा घेत भोसरीपर्यंत सीसीटीव्ही फुटेज गोळा केले. गोपनीय माहितीच्या आधारे संशयिताची ओळख रवींद्र गणपत राजगुरू (वय ५४, सध्या रा. अक्षय नगर, भोसरी, पिंपरी-चिंचवड; मूळ रा. सावरगाव, ता. जुन्नर) अशी पटली. दि. २८ एप्रिल रोजी तो घोडेगाव फाटा येथे येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

# भाजप कार्यकर्त्यावर झाडल्या ९ गोळ्या; राजकीय वर्तुळात खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांदरम्यान मावळ तालुक्यातील देहू रोड येथे धक्कादायक गोळीबाराची घटना घडली आहे. भाजपच्या एका कार्यकर्त्याची अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली आहे. या घटनेमुळे परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.





पोलिसांच्या माहितीनुसार, रमेश रेड्डी असे मृत व्यक्तीचे नाव असून ते भाजपचे सक्रिय कार्यकर्ते होते. रात्रीच्या सुमारास त्यांच्यावर हल्लेखोरांनी तब्बल नऊ राऊंड गोळीबार केला. यातील एक गोळी त्यांच्या डोक्यात लागल्याने ते जागीच कोसळले. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने देहूरोड येथील आधार हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती समजताच नातेवाईक आणि मित्रपरिवाराने मोठा आक्रोश व्यक्त केला. काही काळासाठी जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर रास्ता रोको करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत नागरिकांची समजूत काढली. यानंतर मृतदेह पुढील तपासणीसाठी यशवंतराव चव्हाण रुग्णालयात हलवण्यात आला आहे. दरम्यान, घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून शहरात नाकाबंदी करून आरोपींचा शोध सुरू आहे. या घटनेनंतर देहूरोड बाजारपेठेतील अनेक दुकाने व्यापाऱ्यांनी बंद ठेवली. परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, या हत्येमागील कारणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

# पुणे महापालिकेत भाजपच्या १०० दिवसांवर काँग्रेसचा हल्लाबोल

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत मिळून १०० दिवस पूर्ण होताच काँग्रेसने सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली आहे. हा कार्यकाळ पुणेकरांची फसवणूक करणारा आणि भ्रष्टाचाराने ग्रासलेला असल्याचा आरोप शहर काँग्रेसचे अध्यक्ष अरविंद शिंदे आणि गटनेते ड. रामचंद्र ऊर्फ चंदूशेठ कदम यांनी केला.

प्रशासकीय यंत्रणा आणि सत्ताधारी भाजप यांच्यात 'अर्थ'पूर्ण साटलोटे असल्याचा आरोप करत पुढील काळात तीव आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला. भाजपने जाहीरनाम्यात दिलेली ५०० चौरस फुटांच्या घरांना करमाफी आणि महिलांच्या नावावरील मिळकतींना सवलत ही आश्वासने अद्याप पूर्ण न झाल्याचे काँग्रेसने नमूद केले. महापौर, स्थायी समिती अध्यक्ष आणि सभागृह नेते यांच्यातील अंतर्गत वादामुळे विकासकामे ठप्प झाल्याचा आरोपही करण्यात आला.शहरात वाढती वाहतूक कोंडी आणि विस्कळीत पाणीपुरवठा ही परिस्थिती गंभीर असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे.

पीएमपीएमएलमधील भरती व पदोन्नती प्रक्रियेतील अनियमितता, होर्डिंग निविदेतील वाद आणि कचरा प्रकल्पांतील कथित भ्रष्टाचार यावर काँग्रेसने आवाज उठवला आहे. तसेच बिल्डरांना सवलती देण्याचे धोरण आणि नालेसफाईतील अनियमितता यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

# रुपाली चाकणकरांना होम ग्राउंडवर धक्का; सख्ख्या भावाचा 'या' निवडणुकीत दारुण पराभव

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचे निकाल समोर येत असून अनेक ठिकाणी धक्कादायक घडामोडी पाहायला मिळत आहेत. बीडमधील मस्साजोग येथे दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा पराभव झाल्यानंतर आता पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातही एक मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. (ठींरिश्रिळ उहरज्ञरपज्ञरी)

दौंड तालुक्यातील नांदूर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या निवडणुकीत माजी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे सख्खे भाऊ संतोष बोराटे यांना पराभवाचा धक्का बसला आहे. ही निवडणूक अत्यंत चुरशीची



झाली होती.(ठींरिश्रिळ उहरज्ञरपज्ञरी) या लढतीत विशाल नरेंद्र थोरात यांनी ३०४ मतांनी विजय मिळवत सरपंचपद पटकावले. त्यांच्या विजयामुळे स्थानिक राजकारणात मोठी हालचाल झाल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, संतोष बोराटे यांच्या पराभवामागे स्थानिक पातळीवरील नाराजी कारणीभूत ठरल्याची चर्चा सुरू आहे. त्यांच्या कार्यपद्धतीबाबत मतदारांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. नाशिकमधील भोंदूबाबा प्रकरणानंतर काही काळ राजकीयदृष्ट्या शांत असलेल्या रुपाली चाकणकर पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचे दिसत आहे. दीड महिन्यांच्या ब्रेकनंतर त्यांनी नाशिक जिल्ह्यातील नांदूर येथे कार्यकर्त्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीचे फोटो स्वतः रुपाली चाकणकर यांनी सोशल मीडियावर शेअर केले असून गोतावळ असे कॅप्शन दिले आहे. मात्र, या बैठकीत नेमकी कोणती चर्चा झाली याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे पडद्यामागे काय घडतंय याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

# पुण्यात वृक्षगणना कंत्राटावर वाद; सार आयटी कंपनीच्या निवडीवर प्रश्न

**पुणे । प्रतिनिधी**

मिळकत कराच्या कामातील गंभीर त्रुटींमुळे आधीच वादात सापडलेल्या ठेकेदार कंपनीलाच आता पुणे महापालिकेकडून वृक्षगणनेचे



कोटच्वधी रुपयांचे काम देण्याची तयारी सुरू असल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. या निर्णयामागे राजकीय दबाव असल्याची चर्चा रंगत असून, महापालिकेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

याबाबत अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी सांगितले की, शहरातील झाडांची गणना करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती आणि त्यानुसार 'सार आयटी रिसोर्सेस प्रा. लि.' या कंपनीची निवड करण्यात आली आहे. संबंधित कंपनी कोणत्याही संस्थेकडून ब्लॅकलिस्ट नसून मुंबई महापालिकेनेही त्यांना काम दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, अद्याप वर्कऑर्डर देण्यात आली आहे की नाही, याबाबत त्यांनी अनिश्चितता व्यक्त केली. दरम्यान, या कंपनीने यापूर्वी २०१६ साली महापालिकेच्या मिळकत कराच्या जीआयएस मॅपिंगच्या कामात गंभीर चुका केल्याचे समोर आले होते.

# दिवसाढवळ्या भाजपच्या सक्रीय कार्यकर्त्याला संपवलं! १६ राउंड फायर, देहूरोड गोळीबार प्रकरणी दोन संशयितांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

देहूरोड गोळीबार प्रकरणात मोठी अपडेट समोर आली असून या प्रकरणी देहूरोड पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतलं आहे. काल (२९ एप्रिल) रात्रीच्या सुमारास देहूरोडमध्ये झालेल्या गोळीबारात रमेश रेड्डीची गोळ्या झाडून हत्या झाली होती. या प्रकरणात पोलिसांनी (झींपश झेश्रळलश) तपासाचे चक्र गतिमान करत दोन संशयित पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. यातील एक संशयित मावळ तालुक्यातील गहुंजे मधील साई नगरमधून ताब्यात घेण्यात आला आहे. तर दुसरा संशयित देहूरोड मधील थॉमस कॉलनी इथून पहाटेच्या दरम्यान पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. सध्या पोलीस (झेश्रळलश) या प्रकरणाचा तपास करत असून




यातील मारेकरी शोधून काढणं आता पोलिसांपुढचं आव्हान असणार आहे. देहूरोडमध्ये गोळीबारची थरारक घटना घडली होती. यात भाजपचे सक्रिय कार्यकर्त असलेलं रमेश रेड्डी यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला असून यात एकामागोमाग एक राऊंड फायर केले होते. यातील एक गोळी रमेश रेड्डी यांच्या मस्तकाला भेदून गेल्याने त्याना जखमी अवस्थेत देहूरोडच्या आधार हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केलं असता, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केलं. दरम्यान, या घटनेनं परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता, तर रमेश रेड्डीचे नातेवाईक मित्र परिवाराने हॉस्पिटलमध्ये आक्रोश करत जुना पुणे-मुंबई महामार्ग जाम करण्याचा प्रयत्न केला, पण देहूरोड पोलिसांच्या हस्तक्षेपनंतर रमेश रेड्डीचा मृतदेह पिंपरी चिंचवडच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयात हलविण्यात आला. तर रमेश रेड्डीवर हल्ला झाल्याचं कारण पोलीस तपासात समोर येईल तर या गोळीबाराच्या घटनेमुळे देहूरोड बाजारातील दुकाने व्यापारी वर्गाने त्वरित बंद केली होती. या घटनेनंतर परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. अशातच आता पोलिसांनी तपासाची चक्र गतिमान करत दोन संशयितांना अटक केली आहे. पिंपरी चिंचवडचे डीसीपी विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार देहुरोड पोलीस स्टेशनच्या हद्दीत सवाना चौक येथे अग्निशस्त्र वापरुन एकावर हल्ला झाल्याची माहिती मिळाली होती.

# पोटगी टाळण्याचा पतीचा दावा फोल; न्यायालयाकडून दरमहा ३५ हजारांचा आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

पोटगी टाळण्यासाठी उत्पन्न नसल्याचा दावा करणाऱ्या पतीचा खोटेपणा अखेर उघड झाला. पत्नीने पतीच्या नावावरील सातबारा उतारे आणि रिंग रोडसाठी संपादित झालेल्या जमिनीच्या पहिल्या टप्प्यातील अडीच कोटींहून अधिक मोबदल्याचे ठोस पुरावे न्यायालयात सादर केल्यानंतर, पती आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर न्यायालयाने पत्नी व अल्पवयीन मुलीच्या उदरनिर्वाहासाठी दरमहा ३५ हजार रुपयांची अंतरिम पोटगी देण्याचा आदेश दिला. हा आदेश अर्ज दाखल झाल्याच्या तारखेपासून अंतिम निकाल लागेपर्यंत लागू राहणार आहे. प्रकरणातील विनय आणि विनया (नावे बदललेली) यांचा विवाह १५ मे २०१५ रोजी झाला. त्यांना विराग नावाचा आठ वर्षांचा मुलगा आहे. विवाहानंतर पती व त्याच्या कुटुंबीयांकडून विनया हिचा मानसिक आणि शारीरिक छळ सुरू झाला. अखेरीस तिला घराबाहेर काढण्यात आले. तेव्हापासून ती मुलासह भावाच्या घरात राहत आहे.

पतीकडे सिंहगड परिसरात हॉटेल व्यवसायासह शेतीजमीन असून, रिंग रोड प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनीतून त्याला कोट्यवधींचा मोबदला मिळाला आहे. तरीही तो कोणतीही आर्थिक मदत करत नव्हता. त्यामुळे, तिने ड. तेजवंती कपले यांच्यामार्फत न्यायालयात पोटगीचा अर्ज दाखल केला. दरम्यान, पतीने पत्नी स्वतः कमावती असल्याचा दावा करत पोटगी देण्यास विरोध केला.